मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शनिवार, ३ मे २०२५ » वर्ष: ६ » अंक:१३४ » पाने-८ » किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## एलईटी- आयएसआयचे कनेक्शन

**नवी दिल्ली, दि. २ प्रतिनिधी**

केंद्र सरकारने पहलगाम हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. एनआयएने त्यांच्या प्राथमिक तपासात पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा, इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (आयएसआय) आणि पाकिस्तानी लष्करातील घटकांचा सहभाग असल्याचे ठोस पुरावे उघड केले आहेत. एनआयएच्या तपासात असे आढळून आले आहे की, या भयानक हल्ल्यापूर्वी दहशतवाद्यांनी बेताब खोऱ्यात त्यांची शस्त्रे लपवली होती, असे सूत्रांनी टाइम्स नाऊला सांगितले आहे. यासाठी त्यांना ओव्हरग्राउंड वर्कर्सकडून मदत मिळाली होती. ओव्हरग्राउंड वर्कर्सनी दहशतवाद्यांना स्थानिक पातळीवर महत्त्वाची माहिती पुरवल्याचा आरोप आहे. एनआयएच्या सूत्रांनुसार, दहशतवादी अजूनही दक्षिण काश्मीरच्या जंगलात लपले असण्याची शक्यता आहे.

अग्रलेख

## खरीखरी

## गडकरींची विजयगाथा

नितीन गडकरी त्यांच्या मनात जे आहे. ते बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. आम्ही गेली ३० ते ४० वर्ष त्यांचे समाजकारण, राजकारण आणि लोक कल्याणकारण वेगवेगळ्या कोनातून पाहिले आहे. त्यांची कार्यशैली कधी डोळ्याने, कधी बुद्धीने, तर कधी एकून, कधी वाचून, कधी कधी तर पारखून पारखून बघत आलो आहोत. या माणसाच्या कल्पना गगनविहारी असतात. गडकरी यांना समजून घेणे. भल्याभल्यांना जमत नाही. नितीन गडकरी यांचे बोलणे, वागणे आणि काम करणे याबाबत त्यांची स्वतःची अशी एक ठराविक पद्धत आहे. थोडक्यात सांगायचे झाले. तर हा राजकारणी माणसांच्या घोळक्यात सुखावतो. यांना सर्वांच्या कामाची तळमळ असते. आपल्याला शक्य असेल तेवढी मदत अडला नडलेल्यांना करण्यास नितीन गडकरी सदैव तत्पर असतात. त्यांचा जनता दरबार केवळ जनता दरबार नसतो. तर तो खराखुरा जाणता दरबार असतो. लोकांचे प्रश्न सोडवणे, त्यांच्या समस्यांना उत्तर देणे. लोकांना वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारे मार्गदर्शन करणे, हा नितीनजींचा जन्मजात छंद आहे. समोरचा माणूस कोणत्या पक्षाचा आहे. याचा जराही विचार न करता त्याला मदत करणे, हा दैव दुर्मिळ योग गडकरी यांच्याशी बोलल्यावर दिसून येतो. गडकरी यांना शेतीच्या प्रश्नाबद्दल आणि शेतकऱ्यांबद्दल अगदी अंतरात्म्यापासून जिव्हाळा आहे. आपला शेतकरी आर्थिक दृष्ट्या बलवान व्हावा. त्याच्या हाती चार पैसे खेळावेत. त्याला आत्महत्या करावी लागण्यासारखे मार्ग पत्करावे लागू नयेत किंवा अशी परिस्थितीच येऊ नये. यासाठी वेगवेगळ्या प्रकारे मदत करण्याचे त्यांचे जे काही मार्ग आहेत. ते नागपूरच्या जनतेला नेहमीच दिसतात. साहित्य, नाट्य, लोककला, कविता, क्रीडा आणि इतर कला क्षेत्रातील गुणीजनांचे कौतुक करण्यात गडकरी सदैव रमलेले असतात. अशा बाबतीत ते अग्रेसर असतात. या सर्व कार्य बाहुल्यामुळे गडकरी कोणत्याही कार्यक्रमात वेळेवर पोहोचू शकत नाहीत. असे नितीन गडकरी निवडून कसे काय येतात, हा अनेकांसमोर नेहमीच प्रश्न असतो. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध न्यायालयात काही याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या. गडकरी यांनी आचारसंहिता भंग केली आणि त्यामुळे लोकसभा निवडणूक प्रभावित झाली. असा आरोप करून मोहम्मद नफीस नामक कोणत्यातरी मतदाराने आणि फोनवर कधीच उपलब्ध नसणारे, कोणे एकेकाळचे भारतीय जनता पक्षाचे खासदार नाना पटोले यांनी दाखल केलेला खटला खाटल्यावरच गडप झाला. काहीतरी खुसपटे काढून विनाकारण स्वतःचा आणि न्यायालयाचा त्यासोबत नितीन गडकरी यांचा वेळ दवडणारा खटला म्हणजेच ती याचिका विद्वान न्यायाधीशांनी कमकुवत आणि गुणवत्ताहीन ठरवलेली आहे. कारण नसताना विनाकारण स्वतःची हजामत करून घेण्यास यांना कोणी सांगितले होते. हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. आपल्या देशात उठसूट किरकोळ बाबींसाठी खटले दाखल करणे. हा काही लोकांचा आवडता छंद आहे. खटले दाखल केले म्हणजे आपण काहीतरी फार मोठे काम करीत आहोत. असा आभास निर्माण करण्यात अनेक पराभूत उमेदवार धन्यता मानतात. नाना पटोले गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जवळजवळ पराभूत झालेच होते. पण जीवावर बेतलेली, शेपटावर निभावली. त्यामुळे शंभर, दोनशे मतांच्या फरकाने पटोले यांची आमदारकी कायम राहिली. त्यांच्या विरुद्ध विरोधी पक्षाच्या उमेदवाराने अशी तक्रार करून त्यांची निवडणूक रद्द ठरवली गेली. तर काय बहार येईल असे आम्हाला वाटते. एखाद्या पैलवानाला आपण कुस्तीत पराभूत करू शकत नाही. मग निदान आपल्या वाक्ताड्नाचा प्रयोग करून आपल्याला सुख, शांती, समाधान मिळवून घेणारे अनेक पैलवान समाजात असतात. अशा रडीचा डाव खेळणाऱ्या पैलवानांना न्यायालयाने दिलेली ही चपराक आता तरी समजली पाहिजे. गडकरी यांचे नागपुरातून खासदार असणे. हा नागपूरच्या जनतेला मिळालेला दिलासा असतो. जात-पात पंथ, पक्ष याचा कोणत्याही प्रकारे विचार न करता खरा लोकाग्रणी नेता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे तावून, सुलाखून निघालेला आहे. याचा आम्हाला मनापासून आनंद आहे. एकूण काय, तर कोणीही कितीही खुसपटे काढून नितीनजींना त्रास देण्याचा प्रयत्न केला. तरी त्यातून ते बाहेर पडतात. हीच खरीखरी गडकरींची विजयगाथा आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# हवाई दलाचे जबरदस्त शक्तिप्रदर्शन



## गंगा एक्स्प्रेस वेवर उतरवली मिराज, राफेलसह लढाऊ विमाने

**शाहजहांपूर, दि. २ वृत्तसंस्था**

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.२) उत्तर प्रदेशच्या गंगा एक्स्प्रेस वेवर हवाई दलाने आपले सामर्थ्य दाखवले. राफेल, जग्वार आणि सुखोई सारखी लढाऊ विमाने शाहजहांपूरच्या जलालाबाद येथे बांधलेल्या हवाई पट्टीवर उतरली.

उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर जिल्ह्यातील गंगा एक्स्प्रेसवेवर बांधलेल्या ३.५ किलोमीटर लांबीच्या हवाई पट्टीचे आज (दि.२) उद्घाटन झाले. जे देशाच्या संरक्षण सज्जतेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या ठिकाणी स्थापित केलेल्या प्रगत प्रकाशयोजना आणि नेव्हिगेशन प्रणालींमुळे लढाऊ विमानांच्या दिवसा आणि रात्री लँडिंगसाठी सुसज्ज असलेली ही भारतातील पहिली रोड रनवे आहे. जलालाबादमध्ये स्थित ही हवाई पट्टी मेरठ ते प्रयागराज यांना जोडणाऱ्या ५९४ किलोमीटर लांबीच्या गंगा एक्स्प्रेसवेचा भाग आहे. एक्स्प्रेसवेचे ८५ टक्के बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, ही हवाई पट्टी आग्रा-लखनऊ, पूर्वांचल आणि बुंदेलखंड एक्स्प्रेसवे नंतर भारतीय हवाई दलाच्या ऑपरेशन्ससाठी डिझाइन केलेली उत्तर प्रदेश एक्स्प्रेसवेवरील चौथी कार्यरत पट्टी आहे.

भारतीय हवाई दल शाहजहांपूर हवाई पट्टीवर दोन टप्प्यात लढाऊ विमानांचा सराव करेल. या सरावांमध्ये राफेल, सुखोई-३० एमकेआय, मिराज-२०००, मिग-२९, जग्वार, सी-१३०जे सुपर हरक्यूलिस, एएन-३२ वाहतूक विमान आणि एमआय-१७ व्ही५ हेलिकॉप्टर यांसारखी विमाने सहभागी होती.

## दहशतवाद्यांना शोधण्यासाठी पाकिस्तानने भारताला सहकार्य करावे
## अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांचे विधान

**वॉशिंग्टन, दि. २ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात काही मोठे निर्णय घेतले आहेत. पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासह सिंधू पाणी करार स्थगित केला. तसेच पाकिस्तानी विमानांसाठी भारताने आपलं हवाई क्षेत्र बंद केलं. भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे.



भारताकडून पाकिस्तानवर कधीही लष्करी कारवाई केली जाऊ शकते, अशी भीती पाकिस्तानचे मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी नुकतीच व्यक्त केली आहे. दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी देखील महत्वाची प्रतिक्रिया दिली आहे.'जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी पाकिस्तान भारताला सहकार्य करेल अशी अपेक्षा आहे', असं जेडी व्हान्स यांनी म्हटलं आहे.

जेडी व्हान्स पुढे म्हणाले की, "मला काळजी वाटते, कारण दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत, त्यामुळे कोणत्याही क्षणी तणाव वाढू शकतो. पण आम्ही भारत आणि पाकिस्तानशी संपर्कात आहोत. आम्हाला आशा आहे की भारत या दहशतवादी हल्ल्याला अशा प्रकारे प्रत्युत्तर देईल की त्यामुळे व्यापक संघर्ष निर्माण होणार नाही. तसेच आम्हाला अशीही अपेक्षा आहे की पाकिस्तान त्यांच्या जबाबदारीनुसार त्यांच्या हद्दीत कार्यरत असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी भारताला सहकार्य करेल", असं जेडी व्हान्स यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, जेडी व्हान्स यांचं हे विधान अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या विधानांशी सुसंगत आहे. कारण गुरुवारी अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने म्हटलं होतं की, अमेरिका दहशतवादाविरुद्ध भारतासोबत खंबीरपणे उभा आहे. पंतप्रधान मोदींना आमचा पूर्ण पाठिंबा आहे.

# गडकरी यांच्या विरोधातील दोन्ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भाजपचे महत्वपूर्ण नेते आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यानंतर नितीन गडकरी यांच्याकडे अतिशय महत्वाचे विभाग आहे. गडकरींच्या रस्ते व महामार्ग विभागाने देशभर रस्त्यांचे जाळे विणले असल्याने देशभरात त्यांना विशेष मान दिला जातो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी २०१४ सालापासून नागपूर लोकसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करत आहे. २०१९ मध्ये गडकरींनी काँग्रेसचे नाना पटोले यांना पराभूत करत विजय प्राप्त केला होता. २०२४ मध्येही गडकरी मोठ्या फरकाने विजयी झाले. केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या या विजयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी मोठा निर्णय दिला आहे.

२०१९ मधील लोकसभा निवडणुकीमध्ये केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी मिळविलेल्या विजयाला आव्हान देणाऱ्या दोन निवडणूक याचिकांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जारी केलेल्या आदेशांविरुद्ध याचिकाकर्ते काँग्रेसचे पराभूत उमेदवार नाना पटोले व मतदार मो. नफिस खान यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका गुणवत्ताहीन ठरवून फेटाळण्यात आल्या. न्यायमूर्तीद्वय सूर्यकांत व एन. कोटेश्वर सिंग यांनी



हा निर्णय दिला.२६ फेब्रुवारी २०२१ रोजी उच्च न्यायालयाने पटोले व खान यांच्या निवडणूक याचिकांमधील गडकरी यांच्याविरुद्धचे काही अवमानजनक व आधारहीन मुद्दे वगळण्याचे आदेश दिले. त्यावर पटोले व खान यांचा आक्षेप होता. उच्च न्यायालयाचा आदेश अवैध आहे. त्यामुळे तो आदेश रद्द करण्यात यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली. मात्र सर्वोच्च न्यायालयाला त्यांच्या दाव्यांमध्ये तथ्य आढळून आले नाही.

यंदा त्यांच्या विरोधात काँग्रेसने विकास ठाकरे यांना उमेदवारी दिली होती. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत गडकरी यांनी सहा लाखाहून अधिक मते प्राप्त केली. त्यांच्या विरोधी उमेदवाराला चार लाखाहून अधिक मते प्राप्त झाली. गडकरींनी लोकसभा निवडणूक सव्वा लाख मतांच्या फरकाने जिंकली होती. या विजयावर याचिकाकर्त्याने आक्षेप नोंदविला होता. गडकरी यांनी आचारसंहितेचा भंग केल्यामुळे लोकसभा निवडणूक प्रभावित झाली, असा दावा याचिकांमध्ये करण्यात आला नाही. तसेच, गडकरी यांनी स्वतः, अधिकृत एजंट किंवा निवडणूक एजंटमार्फत आचारसंहितेचा भंग केला, हेदेखील स्पष्ट केलेले नाही, यासह इतर अनेक महत्त्वाच्या मुद्यांकडे या अर्जाद्वारे लक्ष वेधण्यात आले. याचिकाकर्त्यांनी स्वतःची बाजू उचलून धरताना या अर्जाचा विरोध केला. यानंतर न्यायालयाने नितीन गडकरी यांच्याविरुद्धच्या दोन्ही निवडणूक याचिका गुणवत्ताहीन ठरवून फेटाळून लावल्या.

## जे.जे. रुग्णालयाच्या रक्त तपासणी विभागात एसी यंत्रणा कोलमडली
## रुग्ण आणि कर्मचारी त्रस्त


**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

राज्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या जे.जे. रुग्णालयातील रक्त तपासणी विभागातील वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्यामुळे रुग्ण आणि कर्मचारी यांना तीव्र उन्हामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तपासणी विभागात एकूण पाच एसी यंत्रणा लावण्यात आल्या आहेत, मात्र त्यातील केवळ एकच एसी सुरु असून उर्वरित चार यंत्रणा बंद आहेत.

रक्त तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी असताना, विभागात उष्म्यामुळे घामाघूम स्थिती निर्माण झाली आहे. एका बाजूला आजारपणाने ग्रस्त रुग्ण, तर दुसऱ्या बाजूला तपासणी करणारे टेक्निशियनही उष्णतेने त्रस्त झाले आहेत. या असह्य परिस्थितीत तपासण्या सुरळीत पार पडणे अवघड झाले आहे.

यातच रुग्णालयाच्या बाजूलाच नव्या सुपर स्पेशालिटी इमारतीचे काम सुरु असून, सुरक्षेसाठी लावलेले मोठमोठे पत्रे खिडक्यांवर आडवे असल्याने नैसर्गिक हवाही आत येत नाही. त्यामुळे विभागात गरम आणि दमट वातावरण निर्माण झाले आहे.

रुग्णांच्या आरोग्यासोबतच कर्मचारी वर्गाच्या कार्यक्षमतेवरही याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निरीक्षण आहे. प्रशासनाने तातडीने एसी यंत्रणा दुरुस्त करून कार्यरत कराव्यात, अशी मागणी रुग्ण आणि कर्मचाऱ्यांकडून होत आहे.



## लाडकी बहीण योजनाः एप्रिलचा हप्ता दोन-तीन दिवसांत मिळणार

**मुंबई, दि २ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता अद्याप लाडक्या बहिणींना मिळालेला नाही. त्यामुळे एप्रिल महिन्याचा हप्ता कधी मिळणार? याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागलेलं असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात महत्वाची माहिती सांगितली आहे. एप्रिल संपला तरीही अद्याप एप्रिल महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना मिळाला नव्हता. त्यामुळे लाडक्या बहिणींकडून याबाबत प्रश्न विचारले जात होते. असं असतानाच आता महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एप्रिल महिन्याचा हप्ता कधी मिळणार? याची माहिती त्यांनी सांगितली आहे. 'लाभार्थी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये एप्रिल महिन्याचा हप्ता आजपासून (२ मे) जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे', असं आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून (२ मे) सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल. या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठीचा सरकारचा संकल्प अधिक दृढ केला जात आहे", अशी माहिती आदिती तटकरे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत दिली आहे.

# केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले

**रुद्रप्रयाग, दि. २ वृत्तसंस्था**

केदारनाथ मंदिराचे दरवाजे आज सकाळी ७ वाजल्यापासून भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे आहे. यावेळी हजारो भाविकांनी दरवाजे उघडण्याच्या पवित्र क्षणाचे साक्षीदार झाले. मंदिराचे दरवाजे उघडताच केदार खोरे हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमले.



केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडण्याच्या काही वेळ आधी, राज्याचे मुख्यमंत्री पुष्कर धामी केदारनाथला पोहोचले. दरवाजे उघडताच, हेलिकॉप्टरमधून भाविकांवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी प्रथम दर्शन घेतले. धाममध्ये पंतप्रधान मोदींच्या नावाने पहिली पूजा करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री धामी म्हणाले की, अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने बुधवार ३० एप्रिल रोजी चारधाम यात्रा सुरू झाली आहे. आजपासून दोन दिवसांनी भगवान बद्रीनाथ विशालचे दरवाजे देखील उघडतील आणि यात्रा पूर्ण जोमात सुरू होईल. भाविकांचा प्रवास सुरक्षित राहावा आणि त्यांना प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत आणि त्यासाठी आम्ही योग्य व्यवस्था केली आहे.

पुढे मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, श्री केदारनाथ धाम त्याच्या सर्व भव्यतेने सजवण्यात आले आहे आणि तयार करण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळी शुभ मुहूर्तावर योग्य विधींसह दार उघडल्यानंतर, भाविकांना देवाधिशदेव महादेव केदारनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेता येईल. श्री केदारनाथ धामचे दरवाजे उघडण्याच्या वेळी मीही उपस्थित आहे, हा माझ्यासाठी खूप भाग्याचा क्षण आहे.

यात्रेनिमित्त दरवाजांच्या उद्घाटनासाठी मंदिर १०८ क्विंटल फुले आणि हारांनी सजवण्यात आले आहे. त्याच वेळी, सरकार, प्रशासन आणि पोलिसांच्या उच्च अधिकाऱ्यांसह, सुरक्षा दल देखील तैनात आहेत. केदारनाथमध्ये १५ हजारांहून अधिक भाविकांच्या रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, श्री बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय प्रसाद थापलियाल म्हणाले की, दरवाजे उघडल्यानंतर दर्शनासाठी टोकन प्रणाली लागू केली जाईल.

## नॅशनल हेराल्ड : राहुल, सोनिया गांधींसह सहा जणांना कोर्टाची नोटीस

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

नॅशनल हेराल्ड मनी लॉंड्रिंग प्रकरणात दिल्लीतील एका न्यायालयाने शुक्रवारी (दि.२) लोकसभेतील विरोधी पक्षनेते, काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना नोटीस बजावली. काँग्रेसच्या निकटवर्तीयांसह इतर ६ जणांनादेखील नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ मे रोजी होणार असल्याचेदेखील न्यायालयाने म्हटले आहे.

विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. न्यायाधीश गोगणे म्हणाले की, सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्यांच्या आरोपपत्रात ज्यांची नावे दिली आहेत, त्यांना नोटीस बजावताना सुनावणी घेण्याचा अधिकार आहे.

नॅशनल हेराल्ड प्रकरण हे काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डचे मालक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांना ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात 'यंग इंडियनला दिलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाशी संबंधित आहे. एका इक्विटी व्यवहारात २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचा आरोप आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह काँग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला होता.

## कर्जमाफीवर, मी काही आश्वासन दिले होते का? - अजित पवारांचा सवाल

**कोल्हापूर, दि. २ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या एप्रिल महिन्याच्या हप्त्याची महिलांना प्रतीक्षा आहे. अक्षय तृतीयेच्या मुहुर्तावर ही रक्कम महिलांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, अद्याप महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, लाडकी बहीण योजनेच्या एप्रिल महिन्याच्या हप्त्याबाबत महत्त्वाची माहिती दिली. 'लाडकी बहीण'बाबत नियोजन केले आहे. वेळच्या वेळी पैसे कसे दिले जातील याची काळजी घेतली जाईल, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील अडकुर येथे माजी आमदार राजेश पाटील यांनी आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्याला अजित पवार आज शुक्रवारी उपस्थित राहिले. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.



यावेळी ते शेतकरी कर्जमाफीवरही बोलले. 'जमत नाही तर आश्वासन कशाला दिले?', असा सवाल राजू शेट्टी यांनी केला होता. त्यावर अजित पवार यांनी, 'मी काही आश्वासन दिलं होतं का? मी कधी बोललो आहे का?' असे दोन ते तीनवेळा पत्रकारांशी बोलताना प्रतिप्रश्न केला.

पीकविम्याबाबत ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्याबद्दल अभिमान आहे. खताची बचत, पाण्याची बचत यासह अनेक चांगल्या भावनेने कार्यक्रम घेत आहोत. शेतकऱ्यांना पीक विमा देणार असून त्याबाबत कॅबिनेटमध्ये चर्चा केली आहे.

विधानसभेवेळी चंदगडची आमची जागा दुर्दैवाने गेली. बंडखोर उमेदवार निवडून आला. आमचे कार्यकर्ते कमी पडले. कोल्हापुरात महायुतीच्या सर्व जागा आल्या. फक्त चंदगडची जागा गेली, अशी खंतही त्यांनी यावेळी बोलून दाखवली.

काश्मीरमधील पहलगाम येथील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भाष्य केले. दहशतवाद्यांनी घात केला. त्यांचा बदला घ्यायचा अशी माझी आणि सर्व भारतीयांची इच्छा आहे. यावर पीएम मोदी मार्ग काढतील. सर्व पीडीत कुटुंबियांच्या मागे महाराष्ट्र उभा आहे, असे ते म्हणाले.

## अश्लील कंटेंट तयार करणाऱ्या सर्व ॲप्सवर तात्काळ बंदी घालावी- चित्रा वाघ

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

'बिग बॉस ७' स्पर्धक एजाज खान आता नव्या रिॲलिटी शो 'हाऊस अरेस्ट' मुळे चर्चेत आहे. हा रिॲलिटी शो 'हाऊस अरेस्ट' २० एप्रिल पासून ओटीटी प्लॅटफॉर्म 'उल्लू'वर स्ट्रीम होत आहे. या शोचे अनेक क्लिप्स सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यानंतर हा शो वादग्रस्त ठरला आहे. या शोवर अश्लीलतेच्या मर्यादा पार झाल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी एक्स अकाऊंटवर पोस्ट करून अश्लील कंटेंट दाखवणाऱ्या ॲप्सवर बंदी घालण्याची मागणी केलीय. त्यांनी या शोबद्दल मोठे ट्विट केले असून माहिती व प्रसारण मंत्री यांनी असा प्रकारच्या शोच्या कंटेंटवर मर्यादा घालण्यात याव्यात, अशी मागणी केलीय. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर देखील आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी देखील या शो वर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी केली आहे. त्यांनी पोलीस महासंचालकांना याबाबत पत्र लिहिलंय. चित्रा वाघ म्हणाल्या की, "स्वतःला अभिनेता म्हणवणाऱ्या एजाज खानचा 'हाऊस अरेस्ट' नावाचा शो हा केवळ अश्लीलतेचा कळस आहे. उल्लू नावाच्या ॲपवर प्रसारित होणाऱ्या या शोचे क्लिप्स आता मुक्तपणे सोशल मीडियावर फिरत आहेत, जे अत्यंत घाणेरडे आहेत. लहान मुलांच्या मोबाईलमध्ये अशा प्रकारचा कंटेंट सहज पोहोचतो आहे. असे कार्यक्रम म्हणजे फक्त संस्कृतीची अवहेलना नाही, तर समाजाच्या आरोग्याची विटंबना आहे. असे कार्यक्रम म्हणजे भावी पिढ्यांच्या मानसिकतेवर विकृत घाला आहे. मी माहिती व प्रसारण मंत्री यांना विनंती करते की उल्लू ॲपसह असे कंटेंट तयार करणाऱ्या सर्व ॲप्सवर तातडीने बंदी घालावी. "हाऊस अरेस्ट नावाचा शो हा निव्वळ कंटेंट नाही, तर समाजाच्या मूल्यांवर आघात आहे!" रिॲलिटी शो 'हाऊस अरेस्ट' २० एप्रिल पासून ओटीटी प्लॅटफॉर्म 'उल्लू'वर स्ट्रीम होत आहे. या शोचे अनेक क्लिप्स व्हायरल होत असून त्यामध्ये कंटेस्टेंट कॅमेऱ्यासमोर अश्लील कंटेंट प्रेझेंट करताना दिसत आहेत. त्याशिवाय, आणखी एका क्लिपमध्ये चॅलेंजच्या नावावर कंटेस्टेंटचे कपडे उतरण्याची स्पर्धा सुरु आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये कंटेस्टेंट्स कपडे उतरवताना दिसत आहेत.

# पंतप्रधान मोदींची केरळला 8900 कोटींची भेट, विझिंजम बंदर केले देशाला समर्पित

**तिरुवनंतपुरम, दि. २ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विझिंजम आंतरराष्ट्रीय खोल पाण्यातील बहुउद्देशीय बंदराचे आज उद्घाटन केले. त्यांनी सुमारे ८ हजार ९०० कोटी रुपयांचे केरळला गिफ्ट दिले आहे. तसेच 'विझिंजम' हे आंतरराष्ट्रीय बंदर राष्ट्राला समर्पित करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन देखील उपस्थित होते.



केरळ सरकारचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडद्वारे (APSEZ) सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत विकसित करण्यात आला आहे. दक्षिणेकडील राज्याला जागतिक सागरी नकाशावर आणण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे.

केरळमधील विझिंजम हे आंतरराष्ट्रीय बंदकर देशातील पहिले अर्ध-स्वयंचलित बंदर आहे. हे जागतिक स्तरावर सर्वात तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक ट्रान्सशिपमेंट बंदरांपैकी एक म्हणून ओळकले जाणार आहे. या बंदरामुळे जहाजांच्या वाहतुकीचा वेळ कमी होण्यास मदत होईल तसेच मोठ्या कंटेनर जहाजांना हाताळण्याची भारताची क्षमता देखील वाढणार आहे. या बंदरामुळे देशाचे इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे.

या कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी शुक्रवारी (२ मे २०२५) आंध्र प्रदेशच्या एतिहासिक भेटीला निघतील. जो राज्याच्या विकासातील एक एतिहासिक क्षण आहे. ते अमरावतीमध्ये ५८,००० कोटींपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील. गेल्या दशकात अमरावती बांधकाम कामांचा हा दुसरा शुभारंभ असेल कारण पंतप्रधान मोदींनी यापूर्वी २२ ऑक्टोबर २०१५ रोजी हे काम केले होते.

## जिथे संदेश जायचा होता तिथे गेला आहे- पंतप्रधान

विझिंजम बंदराच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन आणि काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्यासोबत व्यासपीठ शेअर केले. यावेळी पीएम मोदी यांनी असे विधान केले आहे की, 'त्या' विधानामुळे राजकीय वर्तुळात अस्वस्थता वाढली आहे.



मोदी विझिंजम बंदराच्या उद्घाटन समारंभात बोलताना म्हणाले की, 'मी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, मुख्यमंत्री विजयन येथे बसले आहेत. ते इंडिया आघाडीचे एक मजबूत आधारस्तंभ आहेत. शशी थरूर देखील बसले आहेत. आजच्या कार्यक्रमामुळे अनेकांची झोप उडेल. जिथे संदेश जायचा होता तिथे गेला आहे." पीएम मोदींच्या या वाक्यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे.

काँग्रेस खासदार शशी थरूर हे काँग्रेसचे तिरुवनंतपुरम लोकसभेचे खासदार आहेत. जे इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लूसिव्ह अलायन्सचे (इंडिया) एक प्रमुख सदस्य आहे. मोदींनी हे वक्तव्य जरी विनोदाने म्हटले असले तरी, राजकीय प्रतिस्पर्ध्यांना अस्वस्थ करण्याच्या उद्देशाने ते होते असे दिसून आले.

# जिल्ह्यात सर्वत्र महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

## ध्वजारोहण, कामगार दिनानिमित्त विविध कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**नाशिक । जिल्ह्यात सर्वत्र महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध ठिकाणी ध्वजारोहणाचे झाले. तसेच कामगार दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.**



### जनता विद्यालय कोमलवाडी येथे महाराष्ट्र दिन, कामगार दिन साजरा...

**सिन्नर** । मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय, कोमलवाडी येथे एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद भाऊ घुले यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. इयत्ता पाचवी ते नववी मध्ये एक ते पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अमोल नाईक यांनी आपल्या मनोगतातून असे व्यक्त केले की, १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन व कामगार दिन म्हणून ओळखला जातो. देशाच्या स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अनेक लोकांनी आंदोलन करून आपल्या प्राणाचे बलिदान दिले. तसेच माझ्या महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात माझ्या भारताची गौरव पताका फडकवली आहे,म्हणूनच मी महाराष्ट्रीयन आहे याचा मला अभिमान वाटतो. स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद भाऊ घुले यांनी आपल्या भाषणातून सर्व निकालात विद्यार्थिनींचे प्रमाण जास्त तसेच वाखणण्याजोगे आहे व्यक्त केले. यावेळी स्कूल कमिटी सदस्य लहानु घुले, सोमनाथ जाधव,खंडू बोंबले, तानाजी बोंबले,नारायण भोर, सोमनाथ सातपुते व शिवाजी बोचरे तसेच विद्यालयाचे शिक्षक सचिन गिते, केशव वळवी, बाजीराव ढोमसे, सौरभ कमानकर, सुदर्शन गांडुळे, मनीषा गोराडे,चित्रा बाजारे, शितल रायते, कीर्ती गवारे, ऋतुजा वाघ, सागर भदाने आदीजण उपस्थित होते.

### थोरात विद्यालय महाराष्ट्र दिन, कामगार दिन उत्साहात साजरा

**पिंपळगाव बसवंत** । मविप्र संचलित कर्मवीर रावसाहेब थोरात विद्यालय व जुनिअर कॉलेज मोहाडी येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती सदस्य जी एम गायकवाड होते. याप्रसंगी व्यासपीठावर म वि प्र चे दिंडोरी पेठ चे संचालक प्रवीण नाना जाधव, मोहाडीच्या सरपंच आशाताई लहांगे, सुरेश सोमवंशी, विजय जाधव, रामराव पाटील ,रवी आप्पा जाधव ,सोनाली जाधव ,एस एस जाधव, दीपक जाधव ,माणिकराव नाठे, उत्तम काका जाधव ,शाम अप्पा जाधव,एल टि गुरुजी, प्राचार्य शरयु भामरे, आयटीआयच्या प्राचार्य माया वारुंगसे , पर्यवेक्षक रवींद्र निकम, प्रदीप जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य शरयु भामरे यांनी केले. माननीय उत्तम काका जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संगीत शिक्षक दिलीप पागेरे व गीतमंच यांनी राष्ट्रगीत व राज्य गीत सादर केले. विद्यालयातील सेविका पल्लवि वैद्य व दौलत हिरे यांचा आदर्श सेवक म्हणून सन्मान करण्यात आला. तसेच विद्यालयातील संगीत शिक्षक दिलीप पागेरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही शालेय परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर मविप्रचे संचालक प्रवीण नाना जाधव यांनी सर्वांना कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष जी एम गायकवाड यांनी देखील सर्वांना कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विद्यालयामध्ये प्रथम दोन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रगती पत्रक देऊन गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमानंतर चावडी वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठि सुंदर असे फलक लेखन कलाशिक्षक कृष्ण जाधव व धनंजय जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद बैरागी व ज्ञानेश्वर भवर यांनी केले तर आभार पर्यवेक्षक रवींद्र निकम यांनी माणले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

### का. वाघ महाविद्यालय पिंपळगाव (ब.) येथे महाराष्ट्र दिन ध्वजारोहण समारंभ

**पिंपळगाव बसंवत** । मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पिंपळगाव बसवंत येथील कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र



दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रोफे (डॉ.) सुरेश जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे, पुंडलिक निरगुडे, भीमराव मोरे, जयवंत निरगुडे, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, प्रा. हेमंत पाटील, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा. रवींद्र मोरे यांनी महाराष्ट्र दिन, मराठी राजभाषा दिन आणि कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## कामगारदिनी युवक राष्ट्रवादीतर्फे सफाई कामगारांचा सत्कार



**नाशिक** । महाराष्ट्र दिन व कामगार दिनांचे अऔचित्य साधून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी नाशिक शहरातील सफाई कामगारांचा शाल व फुले देऊन सत्कार केला.

विविध क्षेत्रात विविध पद्धतीचे कामगार आपले कार्य करत असतात. मात्र सामाजिक आरोग्य दृष्टीने महत्व पुर्ण ठरणा-या सफाई कामगार हे विविध सत्कार कार्यक्रमापासून उपेक्षितच राहतात. केवळ त्यांचा मोठ्या कार्यक्रम समारंभात सफाई कामगार म्हणूनच वापर केला जातो. आणि त्यांच्याकडे पहाताना हि सफाई कामगार म्हणूनच पाहिले जाते. मात्र सामाजिक समृध्द आरोग्य दृष्टीने सफाई कामगार हे समाजाच्या स्वच्छता दुत आणि सर्वपिंक्षा श्रेष्ठ काम करणारे असतात. म्हणूनच त्यांचा सत्कार करून त्यांच्या कार्यात सामाजिक उर्जा निर्माण करून देण्याचा एक छोटासा प्रयत्न यावेळी युवक राष्ट्रवादीने केला.

नाशिक शहर स्वच्छ, सुंदर व स्वस्थ ठेवण्यासाठी नेहमी कार्यतत्पर राहणाऱ्या महापालिकेचे सफाई कर्मचारी अहोरात्र झटत असतात. त्यांचे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या कष्टाची आणि चिकाटीची प्रशंसा करण्यात आली. शहरात रोगसदृश्य परिस्थितीत देखील सफाई कामगार आपल्या कामाला प्राधान्य देतात. आपल्या जीवाची परवा न करता शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मेहनत घेत असतात. कामगारांना आजही अनेक समस्या आणि आव्हाने तोंड द्यावी लागतात. अशा कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हक्कासाठी लढा देण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी नमूद करण्यात आले. यावेळी सर्व पदाधिकारींनी सफाई कर्मचाऱ्यांचे आभार मानले. यावेळी पवन रॉय, विशाल डोखे, विकास सोनवणे, डॉ. संदिप चव्हाण, हर्षल चव्हाण, निलेश भांडूरे, राहुल कमानकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संदीप सेनभक्त निवडणुकीच्या निमित्ताने उतरले क्रिकेटच्या मैदानात

**नाशिक** । नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रातील सक्रिय असलेले संदीप सेनभक्त निवडणुकीच्या मैदानात उतरले आहे.



गेल्या २१ वर्षांपासून त्यांचे नाशिक जिल्हा क्रिकेटशी नातं जोडले गेलं आहे. या काळात ते निःस्वार्थपणे मैदानावर आणि संघटनेत सेवा देत आहे. त्यांना अनंत अडचणी आल्या, आर्थिक परिस्थिती खराब झाली तरी ते मेहनतीने व्रतस्थपणे क्रीडा क्षेत्राची सेवा करीत आहे. त्यांनी एकनिष्ठतेने मैदानावर प्रामाणिकपणे सेवा केली. त्यांनी कधीही पदाची मागणी केली नाही, पण खेळापायी निष्ठावान योगदान नेहमी दिलं आहे. आज त्यांच्या या २१ वर्षांच्या सेवेला तुमच्या मतदारांच्या विश्वासाची गरज आहे. म्हणूनच त्यांनी एकमताने काम करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ते अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीत उभे आहेत, त्यांची माझी प्रामाणिक इच्छा आहे की, लोकांच्या पाठिंब्याने ते नाशिकच्या क्रिकेटला नव्या उंचीवर घेऊन जातील. न्याय, निष्ठा आणि सेवा या तत्त्वांवर ते काम करत राहणार आहे. सर्वांच्या सहकार्याने बदल शक्य आहे, असा त्यांचा दावा असल्याने बॅट या चिन्हावर बटन दाबून त्यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन करतांनाच लोकांच्या प्रेमासाठी आणि नाशिक क्रिकेटच्या सेवेसाठी व विकासासाठी त्यांना पाठिंबा हवा आहे, असे आवाहन त्यांचे समर्थक करीत आहेत.



## पिंपळगावला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी

**पिंपळगाव बसवंत** । पिंपळगाव शहरात वीरशैव लिंगायत समाज व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जगतज्योति संत महात्मा बसवेश्वर यांची जयंती सर्वपक्षीय मान्यवर व समाज बांधवांच्या प्रमुख उपस्थिती बुधवार दि.(३०)रोजी सकाळी उत्साहात साजरी झाली.

जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शहरात महात्मा बसवेश्वर जयंती जयंतीदिनी शहरात सकाळी मान्यवर व समाज बांधवांच्या उपस्थित ठिकठिकाणी प्रतिमपूजन करण्यात आले.याप्रसंगी वीरशैव लिंगायत समाज अध्यक्ष अंबादास अंधाळकर, पिंपळगावचे माजी सरपंच भास्कर बनकर, दिलीप मोरे, सतीश मोरे, बापूसाहेब पाटील, गणेश बनकर, नंदू गांगुर्डे, अल्पेश पारख, उल्हास मोरे, प्रशांत घोडके, अरुण मोरे, नंदू जंगम, प्रकाश घोडके,शिवमूर्ती खडके,रोहित घोडके, गोविंद कुशारे, मयूर गावडे, जगदीश घोडके, प्रदीप चौधरी, विलास नीलकंठ, अरविंद तोडकर, जितू घोडके, दत्ता खडके,नंदू घोडके, आदिंसह समाजबांधव,महिला मंडळी उपस्थित होते.

# पिंपळगाव 'परफेक्ट खाजगी कृषी बाजार'च्या अध्यक्षपदी बापूसाहेब पिंगळे यांची निवड

## नवनिर्वाचित पदाधिकारी, संचालक मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**पिंपळगाव बसवंत** । जउळके वणी येथील पिंपळगांव 'परफेक्ट खाजगी कृषी बाजार'च्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी बापूसाहेब पिंगळे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी महेश कलंत्री व प्रवीण मोरे यांची, सेक्रेटरीपदी अनुप थोरात यांच्यासह संचालक मंडळाची निवड प्रकिया बुधवार दि. (३०) रोजी शेतकरी, व्यापारी व भागीदार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या यथोचित सत्कार करण्यात आला.

शेतकऱ्याच्या शेतीमालाला सर्वात्तम दर मिळावा या उद्देशाने पिंपळगाव कांदा व्यापारी असोसिएशन व बापूसाहेब पिंगळे परफेक्ट डाळिंब मार्केट नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जउळके वणीत गत काही दिवसापूर्वी पिंपळगांव परफेक्ट खाजगी कृषी बाजार शुभारंभ करण्यात आला होता. या खाजगी परफेक्ट खाजगी कृषी बाजारच्या



नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी व संचालक मंडळ यांची निवड प्रक्रिया पिंपळगाव कांदा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष विजयराज बाफना यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.त्यात सर्वानुमते पिंपळगाव परफेक्ट खाजगी कृषी बाजारच्या अध्यक्षपदी बापूसाहेब पिंगळे यांची नियुक्ती करण्यात आली.उपाध्यपदी महेश कलंत्री व प्रवीण मोरे यांची सेक्रेटरीपदी अनुप थोरात यांच्यासह संचालकपदी सुरेश पारख, अतुल शहा, शोभाचंद पगारिया, विजय ठक्कर, हितेश ठक्कर, निखिल घोडके, जीवनकुमार बाफना, यशराज पिंगळे, ज्ञानेश्वर वडणेरे, रवी ठक्कर, अनिल जाधव, रूपेन शहा, चेतन बोरा, रोहित मुथा, आदींची निवड करण्यात आली.तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून संजय पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडीप्रसंगी पिंपळगाव कांदा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष विजयराज बाफना, पिमको चेअरमन हिरालाल पगरिया, करसनदास ठक्कर, किशोर ठक्कर, हसमुख शहा, विशाल भंडारी, आदिंसह शेतकरी व्यापारी, भागीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### नाशिकचा निरज रेवर याचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण

**एकलहरे** । नाशिकच्या निरज गलजी रेवर



या अवघ्या २१ वर्षीय युवकाने आपल्या मेहनतीने आणि कलागुणांनी मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. "आता थांबायचं नाही" या सामाजिक विषयावरील मराठी चित्रपटात त्यांनी सह-दिग्दर्शक (A.D) म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या चित्रपटामध्ये कामगारांच्या दैनंदिन जीवनावर तसेच समाजातील वास्तविक परिस्थितीवर भाष्य करण्यात आले आहे. या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांना संघर्ष, अडथळे आणि त्यावर मात करत जीवनात पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.निरज यांनी इतक्या कमी वयात साधलेलं हे यश नाशिककरांसाठी अभिमानास्पद आहे. आजच्या तरुण पिढीने चुकीच्या मार्गावर जाण्यापेक्षा, अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घ्यावी, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली आहे."आता थांबायचं नाही" हा चित्रपट १ मे २०२५ रोजी, कामगार दिनाच्या दिवशी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.नाशिककरांकडून निरज रेवर आणि त्यांच्या संपूर्ण टीमला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

### सोहम गाडेकरला राज्यस्तरीय स्केटींग स्पर्धेत सुवर्णपदक

**नाशिक** । मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मखमलाबाद



येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयातील कु.सोहम संतोष गाडेकर (इ.१० वी ब) या विद्यार्थ्याने पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटींग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक व प्रमाणपत्र प्राप्त केले. कु. सोहम यास ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अनिल पगार, शरद आहेर, सुनीता उशीर तसेच प्रशिक्षक निनाद भडांगे व पालक संतोष गाडेकर यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. सोहम गाडेकर याने मिळविलेल्या उज्वल यशाबद्दल मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, संचालक रमेश पिंगळे, माजी सेवक संचालक डॉ.अशोक पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, शालेय समिती अध्यक्ष निवृत्ती महाले, पंडितराव पिंगळे, सुरेश पिंगळे, शंकरराव पिंगळे,शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष वाळू काकड, शालेय समिती सदस्य, मविप्र सभासद, ग्रामस्थ, प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

### सागरमल मोदी शाळेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा

**नाशिक** । नाशिक एज्युकेशन सोसायटी संचलित सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर



शाळेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक व संस्थेचे कार्यवाह राजेंद्र निकम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित पालक ,शिक्षक, विद्यार्थी यांना महाराष्ट्र दिनाचे व कामगार दिनाचे महत्त्व सांगितले व सर्वांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी सकाळ सत्र प्रमुख अशोक शिरुडे, दुपार सत्र प्रमुख मनीषा जोशी, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षाविजयालक्ष्मी देव, सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शाळेच्या गीतमंचाने झेंडागीत, राज्यगीत सादर केले. तेजश्री बुवा यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिन याविषयी माहिती सांगितली. निलेश चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांना प्रगती पत्रकाचे वाटप करण्यात आले.

### जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मे पासून कार्यान्वित

**नाशिक** । दिव्यांग कल्याण विभागाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा या उपक्रमांतर्गत प्रादेशिक व जिल्हा स्तरावर कार्यालय सुरू करणे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन आवारातील शासकीय अंधशाळेच्या इमारतीत जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मे २०२५ पासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती नाशिकचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भरत चौधरी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

## महत्त्वाचे

### दोषींवर कारवाई न झाल्यास घोडके यांचा आत्मदहनाचा इशारा



**सिडको ।** दीपक दुसाने या युवकाने तीन वर्षांपूर्वी पोलीस विभागातील काही कर्मचाऱ्यांकडून सातत्याने खंडणी घेतली गेल्यामुळे मानसिक तणावाखाली आत्महत्या केली होती. या गंभीर प्रकरणातील आरोपींवर अद्यापही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, याविरोधात धर्मवीर गजू घोडके यांनी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी सांगितले की, आत्महत्येप्रकरणी गुन्हा दाखल असूनही तीन वर्षांपासून न्याय प्रक्रियेत कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई न झाल्यामुळे पीडित कुटुंब अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. विविध प्रशासकीय पातळ्यांवर निवेदने देऊनही केवळ आश्वासने मिळत असून न्याय मिळालेला नाही. धर्मवीर घोडके यांनी निवेदनात नमूद केले की, सोनार समाज हा लहान असला तरी अन्याय सहन केला जाणार नाही. जर लवकरात लवकर दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर अखिल भारतीय सुवर्णकार समाजाच्या वतीने नाशिकसह राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल. तसेच, येत्या १० मे २०२५ रोजी मंत्रालय, मुंबई येथे आत्मदान करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. यासाठी संपूर्ण जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. या निवेदनामुळे पोलीस प्रशासनाची झोप उडाली असून आता पुढील पाऊल काय उचलले जाते, याकडे संपूर्ण समाजाचे लक्ष लागून आहे.

### भाजप लासलगाव मंडल अध्यक्षपदी नीलेश सालकाडे

**लासलगाव ।** भारतीय जनता पार्टीच्या लासलगाव मंडल अध्यक्षपदी नीलेश सालकाडे यांची निवड करण्यात आली आहे. सालकाडे



यांच्या नावाची घोषणा भारतीय जनता पार्टीचे प्रभारी रवींद्र आहेर यांनी केली. यावेळी सुवर्णा जगताप, कैलास सोनवणे, किरण कुलकर्णी, डॉ. रमेश सालगुडे, नवनाथ जाधव, पत्रकार मच्छिंद्र साळुंके, बापू जाधव, समीर समदडिया, मनोज धनवटे, जालिंदर सानप, शेखर बागूल, अंबादास घोटेकर, विनायक केंद्रे सर, ज्ञानेश्वर शिरसाट, भाऊसाहेब सोनवणे, बापू दरेकर, दशरथ आहेर, धनंजय गांगुर्डे, किशोर जेऊघाले, राजू राणा, वाल्मीक गायकवाड, नीलेश जेऊघाले हे पदाधिकारी उपस्थित होते.

### हिरामण बिडगर यांचा कुस्ती आखाडा ते पोलीस वर्दी प्रवास

**देवळाली कॅम्प ।** कुस्तीच्या मैदानी कसरतीतून पोलीस दलात भरती होऊन आपली वेगळी ओळख निर्माण करणारे हिरामण अंबादास बिडगर हे अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरले



आहेत. त्यांनी २४ डिसेंबर २००७ रोजी नवी मुंबई पोलीस दलात भरती होऊन सेवा सुरु केली. कुस्तीतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यांना पोलीस भरतीमध्ये संधी मिळाली होती. २०१५ साली त्यांची बदली नाशिक शहरात झाली असून सध्या ते देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. २००५ साली महाराष्ट्र कुस्ती चॅम्पियन म्हणून त्यांनी आपल्या नावाची नोंद केली. त्यांनी पोलीस दलाचे प्रतिनिधित्व करत विविध कुस्ती स्पर्धांमध्ये पदके पटकावली आहेत. मैदानातले शिस्तबद्ध आणि जिद्दी व्यक्तिमत्त्व त्यांनी खाकी वर्दीच्या जबाबदारीतही जपले आहे. त्यांच्या निष्ठेची आणि कार्यक्षमतेची दखल घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे वेळोवेळी कौतुक केले आहे. दि. ३० एप्रिल २०२५/रोजी देवळाली कॅम्पचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पिसे आणि पोलीस उपनिरीक्षक मिताली कोळी यांच्या हस्ते बिडगर यांच्या खांद्यावर तीन फित लावून त्यांची हवालदार पदावर बढती जाहीर करण्यात आली. या वेळी देवळाली पोलीस ठाण्याचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित सर्वांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### राजेंद्र काठे यांचा गौरव



**नाशिक ।** आपले सरकार महाराष्ट्र शासन यांनी सन २०२४-२५ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणी करिता केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी नाशिक पूर्व कनिष्ठ लिपीक राजेंद्र प्रकाश काठे याचा प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





# मुख्याधिकाऱ्यांच्या बेताल कारभाराचा त्र्यंबक नगर परिषदेला बसतोय फटका!

## धक्कादायक : माजुरड्या ठेकेदाराने फेकली लाखो रुपयांची झाडे

सुधीर उमराळकर

**नाशिक ।** लाडक्या ठेकेदारामुळे कायमच चर्चेत राहिलेल्या त्र्यंबकच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या बेताल कारभाराचा फटका त्रंबक नगरपरिषदेला बसत आहे. गेल्याच वर्षी तब्बल १ कोटी रुपये खर्चून राबविलेली 'माझी वसुंधरा' योजनेचे अक्षरशः तीनतेरा वाजले असताना देवचक्के यांना या योजनेअंतर्गत लावलेल्या झाडांकडे लक्ष देण्यास अजिबातच वेळ नसल्याने त्रंबकवासियांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. देवचक्के या केवळ 'मलाईदार' कामांमध्ये व्यस्त असल्याने वसुंधरा योजनेतील झाडे मेली की जगली हे सुद्धा बघण्यात त्यांना स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. नगरपरिषदेचा कोट्यवधी रुपयांचा खर्च केवळ ठेकेदारांचे पोषण करण्यासाठीच आहे का?असा सवाल माझी वसुंधराच्या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांनी पदभार स्वीकारल्या पासूनच त्यांच्या वादग्रस्त कारभाराचा फटका त्र्यंबक नगर परिषदेला बसत आहे. त्र्यंबकवासियांना सोयी,सुविधा पुरवण्याऐवजी त्या काही विशिष्ट ठेकेदारांचे पोषण करीत असल्याचा आरोप केला जात आहे. देवचक्के या मलईदार कामांच्याच मागे असल्याचे चित्र असून सध्या तरी त्यांनी एकाच ठेकेदारावर कृपादृष्टी केल्याने नगरपरिषदेतील अनेक कंत्राट वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. त्र्यंबक मधील अहिल्या तलावातील गाळ काढण्यापासून निवृत्तीनाथ मंदिराच्या चप्पल स्टॅन्ड,पार्किंग तसेच वाहनांच्या टोईंगचे ठेके कुणाकडे आहेत याबाबत आता उघड उघड चर्चा होत आहे, कारण देवचक्के यांचा कारभार त्र्यंबकवासीयांच्या चांगलाच लक्षात आला.

त्र्यंबक नगर परिषदेत कामाचे वाटप अपारदर्शक पद्धतीने होत असून नियमानुसार कामकाज करणाऱ्या ठेकेदारांना घरचा रस्ता दाखविला जात आहे.शासकीय कामांची कंत्राट देताना सब कॉन्ट्रॅक्टर नेमू नये असे शासनाचे स्पष्ट आदेश असताना नगरपरिषदेकडून दिली जाणारी जवळपास सर्वच कामे सब कॉन्ट्रॅक्टर म्हणजेच 'लाडक्या' ठेकेदाराकडून करून घेतली जात आहेत. त्यातूनच कामाचा दर्जा, गुणवत्ता




इत्यादींमध्ये मोठी तफावत आढळून येत असल्याने त्रंबक नगर परिषदेकडून शासनाच्या डोळ्यात अक्षरशः धुळफेक केली जात आहे. त्र्यंबक नगर परिषदेमार्फत आतापर्यंत झालेल्या

### माझी वसुंधरा योजनेचा फज्जा

कोट्यवधी रुपयांच्या कामांची सद्यस्थिती काय आहे हे देखील दुर्दैवाने बघितले जात नाही. त्रंबक नगर परिषदेकडून दोन वर्षांपूर्वी तब्बल १ कोटी रुपये खर्चून राबविलेल्या 'माझी वसुंधरा'योजनेचा पुरता फज्जा उडालेला असताना देवचक्के यांना त्याकडे लक्ष देण्यासाठी अजिबातच वेळ नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या योजनेची सद्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता 'बिझी' असल्यामुळे 'विजिट'करता येत नाही असे उत्तर देवचक्के यांनी दिले.मुळात या योजनेत मोठा भ्रष्टाचार करत शासकीय निधीचा मोठा अपहार झाल्याचा झाल्याचा आरोप केला जात आहे. निविदेमध्ये दिलेली झाडे ठेकेदाराने लावलीच नाही. कामे देखील शासन नियमाप्रमाणे करण्यात आलेले नाही. शासनाकडून मिळालेली हजारो झाडे ठेकेदाराने अक्षरशः फेकून दिल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. ज्या ठिकाणी झाडे लावून फोटोसेशन करण्यात आले ती झाडे सध्या मृतावस्थेत पडलेली आहेत. अशी परिस्थिती असल्यामुळे ठेकेदार आणि नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांनी या योजनेचा पैसा गिळंकृत केलाचाही आरोप केला जात आहे. माझी वसुंधरा योजनेसाठी लागलेला १ कोटी रुपयांचा निधी हा केवळ शासकीय निधी नसून हा सर्वसामान्यांचा पैसा आहे. त्यामुळे हा पैसा नेमका कुणाच्या घशात जातो आहे याचा देखील तपास करणे गरजेचे आहे. सध्या विशिष्ट ठेकेदारांचे पोषण करणे हा एक कलमी कार्यक्रम त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी राबवत असून माझी वसुंधरा योजनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

> कुठल्याही शासकीय कंत्राटदाराने कामे घेताना सब कॉन्ट्रॅक्टर नेमू नये असा शासकीय नियम असताना त्रंबक मध्ये मात्र शासनाच्या आदेशाला हरताळ फासल्याचे दिसून येत आहे. सद्यस्थितीत त्र्यंबकमध्ये कोट्यवधींची कंत्राट 'मॅनेज' केली जात असून, रेकॉर्डवरील कंत्राटदार भलताच आणि कामे करणारा ही वेगळाच असल्याचे गंभीर चित्र आहे. त्यामुळे ज्या एजन्सींना कामे दिल्याचे दाखविले आहे, त्या एजन्सीची चौकशी करून त्यांना ब्लॅक लिस्टेड करण्याची मागणी केली जात आहे.


# शासनाच्या नाकावर टिच्चून त्र्यंबकेश्वर मंदिरात लाडू प्रसाद विक्री सुरूच

## मंदिर प्रशासनाची भूमिका संशयास्पद




**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर मंदिरातील वादग्रस्त लाडू विक्री केंद्र आणि देणगी कार्यालयात त्वरित बंद करण्याचे आदेश पुरातत्त्व विभागाने मंदिर प्रशासनाला दिलेल्या असताना शासनाच्या नाकावर टिच्चून आजही राजरोसपणे मंदिराच्या आवारात बेकायदेशीररित्या लाडू विक्री केंद्र सुरूच असल्याने ठेकेदार आणि मंदिर प्रशासनाने थेट शासनालाच आव्हान दिल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या प्रकारामुळे मंदिर प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.



देशविदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले त्रंबकेश्वर मंदिर प्राचीन संस्मारक तथा पुरातन वास्तु स्थळ असल्याने पुरातत्वीय स्थळ आणि अवशेष अधिनियम १९५८ च्या नियम १९५९ नुसार मंदिराच्या आवारात कुठलेही व्यापारी केंद्र उघडता येत नाही. असे असताना त्रंबक मंदिर प्रशासनाने शासकीय नियमांचे उल्लंघन करीत बेकायदेशीर पद्धतीने लाडू विक्री केंद्राला परवानगी दिली. मंदिराच्या आवारात बेकायदेशीररित्या लाडू विक्री केंद्र सुरू केल्या बाबत पुरातत्त्व विभागाला स्थानिकांनी तक्रारी केल्या. त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी भारत सरकारच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग औरंगाबाद यांनी मंदिर प्रशासनाला पत्र देत सदरचे लाडू विक्री केंद्र तसेच देणगी कार्यालय त्वरित बंद करण्याचे आदेश दिले.

सदरचे पत्र प्रशासनाला प्राप्त होऊन बारा दिवस उलटले आहेत, मात्र अद्यापही मंदिर प्रशासनाकडून सदरचे लाडू विक्री केंद्र बंद न करता शासनाच्या नाकावर टिच्चून आजही राजरोसपणे लाडू विक्री केंद्र सुरू असल्याने मंदिर प्रशासन आणि ठेकेदाराचे काही साटेलोटे आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# शहरात शंभर बेडचे आयुष हॉस्पिटल-निसर्ग उपचार केंद्राची उभारणी करा

## माजी खा. हेमंत गोडसेंची ना. जाधव यांच्याकडे मागणी

**देवळाली कॅम्प ।** सिंहस्थ काळात देशभरातून शहरात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेवून नाशिक येथे शंभर बेडचे आयुष हॉस्पीटल व योग आणि अद्ययावत निसर्ग उपचार केंद्राची उभारणी करावी यासाठी माजी खा.हेमंत गोडसे यांनी केंद्रीय आयुष मंत्रालयाचे ना. प्रताप जाधव यांची भेट घेतली.

नाशिक हे उत्तर महाराष्ट्राचे महसूल शहर आहे. शहराला शेजारील पाच जिल्हे जोडले गेलेले असून येथे शंभर बेडचे आयुष हॉस्पीटल व योग आणि अद्ययावत निसर्ग उपचार केंद्राची उभारणी करावी अशी आग्रही मागणी माजी खा. गोडसे यांनी नामदार जाधव यांच्याकडे केली आहे. आयुष अंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी आज नामदार जाधव शहरात आले होते. यावेळी गोडसे यांनी नामदार जाधव यांची शासकीय विश्रामगृहावर भेट घेतली नाशिक शहरातून मुंबई - आग्रा आणि नाशिक - पुणा महामार्ग जात असल्याने शहराला मोठे महत्व आहे.उत्तर महाराष्ट्रासह



सुरत, शिर्डी, जव्हार,पालघर येथूनच विविध उपचारासाठी रुग्ण नाशिक येथे येत असतात. तसेच शहरातील वातावरणही आरोग्याला पोषक असल्याचे यावेळी माजी खा.गोडसे यांनी ना.जाधव यांच्या निदर्शनास आणून दिले. आगामी कुंभमेळ्या उत्सवात हजारो साधू, महतांसह लाखो भाविक शहरात येणार असून या पाश्वभूमीवर शहरात विविध ठिकाणी आयुष क्लिनिक सेंटर तसेच शंभर बेडचे आयुष हॉस्पीटल व योग आणि अद्ययावत निसर्ग उपचार केंद्राची उभारणी करावी अशी आग्रही मागणी गोडसे यांनी नामदार जाधव यांच्याकडे केली आहे.आपली मागणी न्यायिक असून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याची ग्वाही यावेळी ना.जाधव यांनी गोडसे यांना दिली आहे.

# सहकारातून रुग्णालय उभारणीची गरज : डॉ. नंदकिशोर लाड

## वसंत व्याख्यानमालेच्या १०२ व्या पर्वाचा नाशिकमध्ये भव्य शुभारंभ

**नाशिक ।** "दिवसेंदिवस वाढणाऱ्या आरोग्य समस्यांवर उपाय म्हणून सहकार तत्वावर आधारित रुग्णालयांची गरज आहे. रुग्णसेवा ही मोफत नको, पण माफक आणि दर्जेदार असावी," असे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. नंदकिशोर लाड यांनी वसंत व्याख्यानमालेच्या १०२ व्या सत्राच्या उद्घाटनप्रसंगी केले.









नाशिकच्या गोदाकाठी आयोजित या ज्ञानसत्राच्या उद्घाटन सोहळ्यात विभागीय महसूल आयुक्त प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, सह्याद्री फार्म्सचे चेअरमन विलास शिंदे, डॉ. व्ही. आर. काकतकर, वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. लाड यांनी आपल्या व्याख्यानात मुंबईतील 'सुश्रुत हॉस्पिटल'चे उदाहरण देत सहकार तत्वावर चालणाऱ्या रुग्णालयांचे फायदे स्पष्ट केले. "भागधारक तत्त्वावर उभारण्यात आलेल्या हॉस्पिटल्समध्ये सुविधा चांगल्या मिळतात, खर्च आटोक्यात राहतो, आणि रुग्णांना दर्जेदार उपचार मिळतात," असे त्यांनी सांगितले. श्रीकांत बेणी यांनी 'लोकल ते ग्लोबल' या संकल्पनेतून व्याख्यानमालेच्या वाटचालीचा आढावा घेतला. यंदाच्या सत्रात १० आंतरराष्ट्रीय वक्त्यांना आमंत्रित करण्यात आले असून, काळाच्या सोबत व्याख्यानमालेचा होणारा विकासही अधोरेखित करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मविप्र संस्थेचे संगीत शिक्षक दिनकर दांडेकर यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता बाफना यांनी केले.डॉ. लाड यांच्या व्याख्यानानंतर शाहीर स्वप्निल डोंगरे व संच (सिन्नर) यांचा शाहिरी जलशाचा कार्यक्रम संपन्न झाला.

# भ्याड दहशतवादी हल्ला!

किसी मुल्क को बर्बाद करना हो तो लोगो को धर्म के नाम पर लढा दिजिए, मुल्क अपने आप बर्बाद हो जायेगा - लियो टॉलस्टाय यांचे उद्गार आज खरे ठरत आहेत.

२२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष बेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागातून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असतांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २६ पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या.

त्याची प्रतिक्रिया म्हणून देशात संतापाची लाट उसळणे नैसर्गिक होते. या वेळी समस्त विरोधी पक्षांनी सरकारला दिलेला एकमुखी पाठिंबा आणि विविध मुस्लीम संघटनांनी दिलेला संयमी आणि संवेदनशील प्रतिसाद हे सरकारसाठी जमेचे मुद्दे आहेत. पुलवामाप्रमाणेच यावेळीही सुरक्षा यंत्रणेबाबत काही शंका आहेत.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशातून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात, पहलगाम हे भारत-पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला ८ तास तरी लागतातच.

अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तबाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करुन आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू-काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलाला सुद्धा त्याचा चांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते.

जम्मू काश्मीर हा देशातील सर्वांत मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. २४ तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते, मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

सुमारे दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक नसणे, गुप्तचर यंत्रणेला सुगावा न लागणे याची जबाबदारी कोणाची? काश्मीरचे स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता.

त्या दिवशी पहलगाम परिसरात २५०० पर्यटक होते, बेसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कुणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते, काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली.

पहलगाममध्ये २५०० पर्यटक असतांना ज्या बेसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती, कुठेही पोलीस चौकी नव्हती, कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २६ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे.





**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

दहशतवादी निश्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार, ते काही बंदुका हातात येऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर अनेक दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही.

पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले?

मोदी सरकारच्या दोन कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा धरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू शकले? साडेचारशे किलो आरडीएक्स हाय सिक्युरिटी झोनमध्ये कसे येऊ शकले? सुरक्षा दलाचे जवान विमानाने न जाता बसेसमधून प्रवास करीत आहेत ही माहिती दहशतवाद्यांपर्यंत कशी पोहोचली? पुलवामा हल्ला करणारे दहशतवादी कोण आहेत, कुठे आहेत?

पुलवामाचा बदला म्हणून भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये पुसून बालाकोटला एअर स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे असंख्य अड्डे उद्धस्त केले असे सांगितले गेले, मग त्यानंतरही काश्मीरवर दहशतवादी हल्ले कसे चालू राहिले? तेव्हा ४४ सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले.

आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू-काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाचत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली. दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बेसरनला पोहोचले.

बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बेसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्रमंडळी व परिवारासह मौज-मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक निःशस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बेसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याची सुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढतांना मरण आले, पण मुंबई सर्व दहशतवादी पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून-वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला, त्याच कसाबला नंतर फाशी झाली. ■ ■ ■

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

# भ्रष्टाचार थांबणार तरी कधी?

भारत देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे तर दुसऱ्या बाजूने भ्रष्टाचाराची कीड भारतीय व्यवस्थेला खिळखिळी करत आहे. आजमितीला गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचाऱ्यांची प्रमुख लक्षणे आहेत.

'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून घ्यायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लगेच हा सरकारी खात्यांचा जणू अलिखित नियम बनला आहे. भ्रष्टाचारावर आळा बसण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत; मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्यातूनही भ्रष्टाचाराच्या विविध वाटा शोधून काढल्या आहेत.

आज देश मोठ्या युद्धाच्या तयारीत आहे त्यासोबत गृहयुद्ध भडकू नये याचीही सिद्धता करत आहे, तर दुसऱ्या बाजूने सरकारी अधिकारी भ्रष्टाचाराच्या धनातून आपल्या पुढच्या कित्येक पिढ्यांची सोय करत आहेत. इतरांच्या कष्टाचा पैसा ओरबाडून यांच्या पुढच्या पिढ्या खरोखर सुरक्षित जीवन जगणार आहेत का?



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा अहवाल आला असून यंदा राज्याच्या महसूल खात्याने पोलीस खात्यालाही मागे टाकले आहे. १ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना अटक करण्यात आली आहे. ज्यामध्ये महसूल खात्याचे ५६ तर पोलीस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत.

सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार असल्याने अन्य प्रकरणे ही अन्य सरकारी खात्यांच्या संदर्भातील आहेत ज्यामध्ये पंचायत समिती मधील २५, महावितरण खात्यातील मधील १२ , महापालिका प्रशासनातील १०, जिल्हा परिषदेतील १०, आरोग्य विभागातील १० आणि शिक्षण विभागातील ८ प्रकरणे उघडकीस आली आहेत .

प्रत्येक सरकारी कार्यालयात 'लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे' अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते; मात्र या पाटीखालीच सवार्धीक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. लाच मागणाऱ्याच्या विरोधात तकार प्रविष्ट करण्याचे आवाहन लाच-लुचपत खात्याकडून वेळोवेळी केले जाते, त्यासाठी जागृतीही केली जाते ज्याचा परिणाम म्हणून लाच मागणाऱ्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत नक्कीच वाढले आहे; तरीही आपली कामे लवकर करून घेण्यासाठी या भ्रष्टाचाऱ्यांची पोटे भरणाऱ्यांचीही या देशात कमी नाही.

शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे.

कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात.

शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते.

सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ.

तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो.

इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वाथार्साठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

■ ■ ■

# चित्रकर्मीतील एक अग्रणी!

भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. तिसरी घंटा जाहीर केलेल्या वेळेवरच देणारे आणि त्याच क्षणी बुकिंगची पर्वा न करता नाटक सुरू करणारे एकमेव निमार्ता आणि अभिनेते होते. मुंबई साहित्य संघात त्यांची स्वतःची रेकॉर्डिंग रूम होती. त्यात त्यांनी असंख्य नाटके रेकॉर्ड करून ठेवलेली आहेत.. त्यांत प्रायोगिक नाटके, संघात झालेल्या प्रत्येक नवीन प्रयोगाचे ध्वनिमुद्रण त्यांनी केले होते.

--------------

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. भालजींचा जन्म २ मे १८९८ रोजी कोल्हापूर संस्थानचे तत्कालीन सहायक शल्यचिकित्सक डॉ. गोपाळराव आणि राधाबाई पेंढारकर यांच्यापोटी कोल्हापुरात झाला.



निर्माते-अभिनेते बाबूराव पेंढारकर हे त्यांचे ज्येष्ठ बंधू. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले.

भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले.

पुण्यातल्या लक्ष्मी थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याच्या भावनेचा व स्वातंत्र्याचा दिव्य संदेश भालजींनी आपल्या चित्रपटांतून दिला. बहिर्जी नाईक, नेताजी पालकर, मोहित्यांची मंजुळा यांतील संवादांमधून भालजींनी दुबळेपणा व लाचारीविरुद्ध शाब्दिक आसूड ओढले.

स्वातंत्र्य मिळाले तरी सुराज्य निर्माण करण्यासाठी त्याग, निष्ठा, औदार्य व संयमी असा खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली तरुण पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी समृद्ध आशयासह कला व तंत्र या दोन्ही दृष्टिकोनातून उत्कृष्ट अशा चित्रपटांची निर्मिती केली.

भालजींचे चित्रपट किंवा त्यांची निर्मिती संस्था म्हणजे कलाकार व तंत्रज्ञ घडवणारी एक मोठी कार्यशाळाच होती. तसेच त्यांचा संच म्हणजे कुटुंबच होते. शिस्तबद्धता, वेळापत्रकानुसार काम, कामांचे नेटके वाटप, स्तोत्रपठण, प्रार्थना, रेखीव दिनक्रम, वगैरे... चित्रपटाच्या माध्यमातून भालजींनी सुलोचनादीदी, चंद्रकांत मांडरे, सूर्यकांत मांडरे, जयश्री गडकर असे असंख्य कलाकार घडवले.

शिवाजीचा काळ आणि त्या काळातील व्यक्तिरेखा व प्रसंग ही भालजींच्या चित्रपटांची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिदीर्मुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. १९४८ मध्ये गांधीजींची हत्या झाल्यानंतरच्या दंगलीमध्ये भालजींचा कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ जाळला गेला. नुकताच तयार झालेला मीठभाकर व बाळ गजबरांचा मेरे लाल हे चित्रपट आगीत भक्षस्थानी पडले. दीडशे ते दोनशे कामगार बेकार झाले.


भालजींनी पुन्हा लाखो रुपये खर्चून जयप्रभास परत उभे केले. जिद्दीतून मीठभाकर व मेरे लालची पुनर्निर्मिती केली. मीठभाकरने चांगला व्यवसाय केला. भालजींनी कोल्हापुरात मराठी चित्रनिर्मितीस पुन्हा एकदा वेग मिळवून दिला.

भालजी पेंढारकरांच्या बोलपटांच्या सुरुवातीलाच बहु असोत सुंदर, आकाशवाणी, पार्थकुमार, कालियामर्दन, सावित्री अशी सुरू झालेली त्यांची कारकीर्द नेताजी पालकर, थोरातांची कमळा, वाल्मिकी, मीठभाकर, छत्रपती शिवाजी, गाठ पडली ठका ठका, मोहित्यांची मंजुळा अशी वळणे घेत गेली.

साधी माणसं, गनिमी कावा आणि शेवटचा शाब्बास सूनबाई असे तब्बल पंचेचाळीस चित्रपट त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले. या चित्रपटांत ते दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद किंवा निर्मिती या नात्याने कार्यरत होते. अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षीचे- भालजींचे कोल्हापूर येथे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिदीर्मुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. भारतीय चित्रपटसृष्टीच्या अप्रगत अशा कालखंडात मूकपटापासून सुरुवात करत उत्तमोत्तम बोलपट निर्माण करून चित्रपटसृष्टीचा भक्कम पाया घालणारे सर्जनशील, प्रयोगशील चित्रपटकर्मी म्हणून त्यांचे नाव भारतीय कलेच्या इतिहासात कायमचे नोंदले गेले आहे. चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

■ ■ ■



**कृष्णकुमार आनंदी**
**गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

# विरोधासाठी विरोध नवा राजकीय मंत्र

भारतीय लोकशाहीमध्ये सरकार काहीही निर्णय घेईल, की विरोधकांचा 'आक्रोश अलार्म' वाजतो. सरकार म्हणालं...जनतेसाठी मोफत ऑक्सिजन, तर विरोधक ओरडतात... हा ऑक्सिजन उद्योगाचा अपमान आहे! सरकार परीक्षा ऑनलाइन घेणार म्हटलं, तर लगेच प्रतिक्रिया... विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर गदा! अलिकडेच पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली... सर्वांनी एकमताने सांगितले की ते सरकारसोबत आहेत... बाहेर आल्यानंतर आठवले... हे काय आहे, आम्ही निषेध केला नाही. मग सरकारचे अपयश काय होते... सिंधू करार कसा मोडता येईल... शिरच्छेदित पंतप्रधानांच्या प्रतिकात्मक चित्रावरून सरकारचा विरोध... सरकारमधील लोकांचे दहशतवादी संबंध आहेत हे उघड करण्यात विरोधकांनी वेळ वाया घालवला नाही.



त्यांना हेही माहित नाही की जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा सरकारला बंद दाराआड प्रश्न विचारले पाहिजेत... आमचे श्रीमान ओवेसी त्यांच्यापेक्षा चांगले निघाले... जे खुल्या व्यासपीठावरून पाकिस्तानच्या घृणास्पद कृत्यांचे उघडपणे चांगला समाचार घेत आहेत. पण विरोधी पक्ष आपली परंपरागत मते सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत आहे.

आजकाल विरोधकांचे मुख्य शस्त्र म्हणजे भावना आणि अविरोध विरोध. सरकार रस्ता बनवते... हा पर्यावरणावर हल्ला! सरकार झाडं लावते.... ही जमीन बळकावण्याची योजना! सरकार वाय-फाय देतंय... ही गुप्तहेरगिरी सुरू झाली!

विरोध आता मुद्द्यांवर आधारित नसलं तरीही, मुद्दाम केलेला असतो. सरकारचा कुठलाही निर्णय झाला की विरोधक आधी विरोध करतात, मग विचार करतात, नेमकं सरकार केलं तरी काय?

आता तर काही पक्षांनी विरोध प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहेत. तिथे कार्यकर्त्यांना शिकवलं जातं, सरकारच्या वाक्यांचं विघटन कसं करावं? रस्त्यावर बसण्याचा योग्य कोण कोणता?मीडिया समोर अश्रू कसे ढाळायचे?



**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**९४२२१२५६५६**

एका विरोधी नेत्याने तर स्पष्ट सांगितलं, सरकारच्या कुठल्याही चांगल्या गोष्टीला पाठिंबा दिला, तर जनतेला संशय येईल की आपण खरोखरच विरोधक आहोत का सरकारचे गुप्त सहयोगी!

म्हणूनच आता विरोधकांची एकमेव मागणी आहे, सरकारने कोणताही निर्णय आमच्या विरोधाच्या तयारीनंतरच घ्यावा! ■ ■ ■

## वाचक लिहितात

### व्यक्तीस्वातंत्र्याचे धोरण असणे आवश्यक

आतंकवाद्यांचा बुद्धिभेद (ब्रेनवॉश) करणारे त्यांचे पाकिस्तानी मास्टरमाइंड असतात. सुरक्षा यंत्रणा अशांवर चांगलेच लक्ष ठेऊन असतात. हे मास्टरमाइंड जितके दहशतवादी कटाचे गुन्हेगार आहेत तितकेच ती घटना घडल्यानंतर मुळ समस्येला बगल देऊन लोकांना भ्रमित करणारे राजकारणी आणि मिडीया देखिल तितकीच गुन्हेगार आहे असे मला वाटते.

पहलगाम आतंकवादी हल्यानंतर प्रत्यक्षदर्शींनी रोखठोकपणे सांगितले की आमच्या पुरुषांना धर्म विचारून मारण्यात आले. तरी देखील भारतातील अनेक राजकीय व्यक्तिंनी समाजाला भ्रमित करून हा भाग कसा खोटा आहे आणि असे काही घडलेच नाही, दहशतवाद्यांनी स्त्रियांना काही केले नाही मग हे किती चांगले आहे वगैरे सांगून आतंकी विचारांना छुपे अभय प्रदान केले.

मागे सर्जिकल स्ट्राइकचे पुरावे द्या असे सांगून सैनिकांवर ह्याच मंडळींनी अविश्वास दाखवला होता. अशा राजकीय व्यक्तिंना आणि व्यक्तिंच्या पक्षावर याशिवाय लोकांना भ्रमित करणारे बॉलीवुडचे प्रतिष्ठित अभिनेते, कथित समाजसुधारक, लेखक यांना खर म्हणजे वैचारिक दहशतवादी घोषित करून देशद्रोहाचा ठपका ठेवला पाहिजे.

खरच पहलगामच्या दहशतवादी घटनेनंतर माझे डोळे उघडले आणि आता असे वाटू लागले आहे की लोकांच्या दृष्टिने हितकारक अशा विचारसरणीचा संविधानाने स्वीकार केला पाहिजे. अहितकारी दहशतवादी विचारसरणीला संविधानाने संरक्षण देणे आता बंद केले पाहिजे ! कोणत्या विचारांना संरक्षण, प्रसार आणि प्रसिद्धि दिली पाहिजे हे आता भारताने ठरवले पाहिजे. खरच व्यक्तिस्वातंत्र्याचे घटनात्मक नैतिक धोरण (पॉलीसी) ठरवले गेले पाहिजे.

■ **भूषण प्रदीप वाळणुसकर, डोंबिवली.**

# कलिंगड खरेदी करताना या पाच गोष्टी लक्षात ठेवा



उन्हाळा आला की बाजारात कलिंगडांची रेलचेल दिसते. उन्हाच्या झळा थोपवण्यासाठी आणि शरीरातील पाण्याची पातळी टिकवण्यासाठी अनेक जण कलिंगड खाणं पसंत करतात. पण तुम्ही घेत असलेलं कलिंगड खरंच नैसर्गिक आहे का? की रसायनांनी भरलेलं? योग्य माहिती नसेल, तर स्वादासाठी खाल्लेलं कलिंगड आरोग्यावर घातक ठरू शकतं!

**उन्हाळ्यात कलिंगड का खातात?**

उन्हाळ्यात ताजंतवानं राहण्यासाठी कलिंगड हा उत्तम पर्याय आहे. सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारची कलिंगडं दिसत आहेत. पण याचबरोबर काही धोकादायक आजारांचं प्रमाणही वाढतंय, ज्यात कर्करोगाचाही समावेश आहे. काही कलिंगडांमध्ये रसायनांचा वापर केला जातोय. त्यामुळे कलिंगड खरेदी करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे, नाहीतर तुमचं संपूर्ण कुटुंब आजारी पडू शकतं.

**बनावट कलिंगड कसे ओळखावे**

कलिंगडाचा गर खूपच लाल आणि चमकदार दिसत असेल, तर ते बनावट असण्याची शक्यता आहे. कापताना त्यातून फेस निघत असेल, तर ते अजिबात खाऊ नका. रसायनयुक्त कलिंगडाची चव थोडी वेगळी आणि काहीशी कृत्रिम वाटू शकते. तसेच, साल खूप चमकदार किंवा अस्वाभाविकरीत्या गुळगुळीत दिसत असेल, तर ते खरेदी करणं टाळा. बाजारात अशा बनावट कलिंगडांमुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत.

**अस्सल कलिंगड कसं निवडावं?**

कलिंगड खाण्यापूर्वी ते थंड पाण्यात ३० मिनिटं भिजत ठेवा. खूप लालसर चमकणारं कलिंगड घेऊ नका. बाजारात उघड्यावर कापलेलं कलिंगड खरेदी करणं टाळा, कारण त्यात जिवाणू असण्याची शक्यता असते. घरी कापताना त्यातून फेस किंवा रसायनाचा वास येत नाही ना, याची खात्री करा. हे छोटे उपाय तुम्हाला सुरक्षित ठेवू शकतात.

**कलिंगडामुळे कोणते आजार?**

बाजारातील काही कलिंगडं लवकर पिकावीत म्हणून इथर, कार्बाइड किंवा रंग यांसारख्या रसायनांचा वापर केला जातो. ही रसायनं शरीरात गेल्यास कर्करोग, यकृताचं नुकसान, मूत्रपिंडाच्या समस्या आणि हार्मोनल असंतुलन होऊ शकतं. काही विक्रेते गराला जास्त लाल दाखवण्यासाठी कृत्रिम रंग मिसळतात. हे रंग जर खाद्यप्रमाणित नसतील, तर ते कर्करोगाला आमंत्रण देऊ शकतात. शिवाय, कलिंगड जास्त काळ साठवून ठेवलं किंवा नीट स्टोअर केलं नाही, तर त्यात बुरशी वाढते. ही बुरशी ॲफ्लाटॉक्सिन नावाचं विष तयार करते, ज्यामुळे यकृताचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. ■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### भेकड हल्ला..?

शत्रु असता उशाशी
सावध रहावे अष्टोप्रहर
नजर हटी दुर्घटना घटी
अनुभूती येते वरचेवर ..!

शत्रु हा शत्रुच असतो
गणिमी काव्याने करतो चित
त्याला भेकड हल्ला म्हणणे
आहे का बरं यथोचित?

उद्दीष्ट साध्य करण्या
शत्रु असतोच टपून
आपला गाफीलपणाच
त्याला संधी जाते देऊन ..

# [illegible] 'ऑल्व्[illegible] ऑर पूरो २०२५' [illegible]



[illegible] 'ऑल्व्ह ऑर पूरो २०२५' [illegible] #DigitalIndia [illegible] प्रो. [illegible] २०३० [illegible] २०४० [illegible]



## [illegible]

[illegible] २०२५ [illegible]

## [illegible]

नागपूर, २ [illegible] २०२३ [illegible] २०२४ [illegible] ३१ [illegible] २०२४ [illegible] १९०० [illegible]

## [illegible]

नागपूर, २ [illegible] १० रु. [illegible] CRISIL [illegible] ३१ [illegible] २०२४ [illegible] CRISIL [illegible]

## [illegible]



[illegible]

## [illegible]

[illegible] १० [illegible] २० [illegible] १/३ [illegible]

## आज का अंदाज

शनिवार ३ मे २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ३८० | १४९ | ४४७ | २८८ | ११० | २३० | १६९ | ८९० |
| ४७० | २४८ | ३६६ | ४६८ | २०० | ३५७ | २६८ | २५, |
| ५६० | ३४७ | २६७ | ३५० | ३९० | ७८० | ३६७ | १६० |
| १० | ४० | ५३ | ८३ | २४ | ५४ | ६१ | ७१ |
| ११ | ४१ | ५२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १७ | ४७ | ५६ | ८६ | २१ | ५१ | ६३ | ७३ |

**३ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २५ | ३५ | ६७ | ९७ |
| २८ | ३८ | ६४ | ९४ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशिभविष्य

[illegible]

## [illegible]

[illegible]

## [illegible]

[illegible]

## [illegible] १ [illegible]



[illegible]

## [illegible]



[illegible]

## ➢ महत्त्वाचे

### नाशिक ते राजस्थान स्वतंत्र रेल्वे सुरु करण्याची मागणी

**नाशिक ।** नाशिकवरून राजस्थानला जाण्यासाठी स्वतंत्र रेल्वे सुरू करा अशी मागणी राजस्थान हरियाणा गुजरात प्रवासी संघाकडून



केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत संघटनेच्यावतीने जाधव यांना निवेदन दिले आहे. यावेळी राजस्थान हरियाणा गुजरात प्रवासी संघाचे तेजपाल सिंह सोढा, राम सिंह राजपूत, बलवीरसिंह शेखावत, रोशनसिंह राजपूत, महेंद्रसिंह राजपूत, भगवत राजपूत यांच्यासह संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संघटनेच्या वतीने तेजपाल सिंग सोढा म्हणाले की, नाशिक ही कुंभ नगरी असून धार्मिक पर्यटनासाठी राजस्थान येथून हजारो भाविक नाशिकमध्ये येत असतात मात्र नाशिक हून राजस्थानला जाण्या येण्यासाठी स्वतंत्र रेल्वे नसल्याने प्रवाशी वर्गाचे प्रचंड हाल होतात. नाशिक शहर आणि जिल्ह्यात सुमारे ८ लाख राहतात तरी देखील ट्रेन नसल्याने नाशिक ते राजस्थान अशी स्वतंत्र रेल्वे असणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. यावेळी राजस्थान येथील नागरिक नाशिक जिल्ह्यात एवढ्या संख्येने असताना स्वतंत्र रेल्वे नसल्याने याबाबत आपण केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करून गाडी सुरू करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करू, असे आश्वासन प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

### मुक्त विद्यापीठात कामगार, महाराष्ट्र दिन साजरा

**नाशिक ।** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात १ मे हा आंतरराष्ट्रीय



कामगार दिन व महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलतांना कुलगुरू सोनवणे यांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे महत्व विषद केले. जगाच्या प्रगतीचा प्रत्येक टप्पा हा कामगारांच्या घामाने व रक्ताने सजला असून महाराष्ट्राने भारत देशाच्या प्रगतीत व वाटचालीत नेहमीच महत्वाची भूमिका बजावली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सचिव डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा संचालक डॉ. सुरेंद्र पाटोळे, संगणक शास्त्र विद्याशाखा संचालक श्री. माधव पळशीकर, मूल्यमापन विभाग संचालक डॉ. सज्जन थूल, कृषी विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. माधुरी सोनवणे, विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. चेतना कामळस्कर, ज्ञानस्तोत्र केंद्र प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे, श्री. सुनील निकम, श्री. संतोष सोनार यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

### माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गि. दे. पाटील विद्यालयाचे यश

**नाशिक ।** ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक संस्थेच्या महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता ८ वीतील ११ विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये नेत्रदीपक यश मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ.८वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच घोषित करण्यात आला. गाडरी रंजीत बहिरूलाल १६२ गुण, अस्वले यश अर्जुन १६० गुण, खांडबहाले सार्थक दत्तात्रय १५६ गुण, वाघ मानव कुणाल १५४ गुण, साळवे निसर्ग नंदकुमार १५२ गुण, खेटरे प्रतिज्ञा संजय १५२ गुण, दिवे ज्ञानेश्वरी सुरेश १५० गुण, साळवे वैष्णवी रतन १४४ गुण, चव्हाण श्रेयस राम १४० गुण, साळवे श्रेयश प्रशांत १४० गुण, बोडके धनश्री रामदास १३६ गुण या विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाचा नावलौकिक वाढवत विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यावेळी या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक अशोक भदाणे, उपशिक्षक संजय पवार, उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे, समाधान शेवाळे, देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, सुरेखा आहेर-भामरे, दीपाली वाडीले, अश्विनी चौरे, लिपिक अतुल कुलथे, दिलीप खांडबहाले, विलास येवले आदींचे मार्गदर्शन लाभले.

# नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध : ना. गिरीश महाजन

## महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा स्थापना दिवस साजरा

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळा स्वच्छ व हरित होण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. तसेच नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 66 व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ पोलिस संचलन मैदानावर आज सकाळी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलिस महानिरिक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने आदी उपस्थित होते. यावेळी पोलिस दल, गृह रक्षक दल, राज्य उत्पादन शुल्क, अग्निशमन दल, नागरी संरक्षण दल, शहर पोलिस वाहतूक शाखेच्या तुकडीने संचलन करून मानवंदना दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कार, प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महाजन म्हणाले की, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सन २०२६- २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्याचे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून नियोजन सुरू आहे. गेल्या मार्च महिन्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नाशिक/त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन सिंहस्थ कुंभमेळा कामकाजाचा आढावा घेतला. स्वच्छ आणि सुंदर, पर्यावरण पूरक कुंभमेळ्याच्या कामाला चालना देण्यात येईल. तसेच कुंभमेळ्यानिमित्त निर्माण होणाऱ्या पायाभूत सोयी सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी कोणत्याच गोष्टींची उणीव जाणवू देणार नाही. तसेच स्वच्छ व हरित कुंभ पार पडण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील काही वाड्या, गावांना सध्या





पाणीटंचाई जाणवत आहे. अशा ७८ वाड्या, गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच दहा गावांसाठी विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ३३ टक्के जलसाठा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही टक्केवारी समाधानकारक आहे. प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे.

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १ हजार २२२ग योजनांचे काम हाती घेण्यात आले आहे. यामध्ये एक हजार २९६ गावांचा समावेश आहे. आतापर्यंत ६ लाख ७० हजार ९३६ कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली आहे हे सांगताना मला आनंद होत आहे. उर्वरितउ कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत, असेही महाजन यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी ॲग्री स्टॅक फार्मर आयडी म्हणून नोंदणी करून घ्यावी. यासह कृषी विभागाच्या माध्यमातून विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. नाशिक जिल्ह्यात खरीप पीक कर्ज वितरणाला सुरुवात झाली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून १५ हजार १४५ सभासदांना १४८ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे. पावसाळा जवळ आला आहे. यामुळे कर्ज वितरण प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ करीता सर्वसाधारण योजनेसाठी ९०० कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी ४४३ कोटी रुपये, तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०१ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे. पोलिस दलाने नावीण्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी आणि तक्रारींची तत्काळ दखल घेता यावी म्हणून बळीराजा सेल कार्यान्वित केला आहे. आतापर्यंत ९५८ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. पोलिस दलाने या शेतकऱ्यांना २ कोटी ३३ लाख ४२ हजार रुपये परत मिळवून दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. आपल्या नाशिक जिल्ह्यात १५ लाख ३५ हजार ४४७ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. महिला, तरुणींना आत्मनिर्भर करणे आणि महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी नाशिक शहरात १ हजार महिलांना पिंक (गुलाबी) ई रिक्षा योजनेच्या माध्यमातून लाभ मिळणार आहे. राज्यातील सर्व शाळा आता जिओ टॅगिंग करण्यात येणार आहेत. यामुळे शिक्षण विभागाची सर्व माहिती एकाच छताखाली उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनाचा संकल्प सोडावा, असेही आवाहन मंत्री महाजन यांनी केले. यावेळी आमदार सीमा हिरे, महानगर पालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार, अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलावले, रवींद्र भारदे, शुभांगी भारदे यांच्यासह लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या स्थापना दिवसानिमित्त आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सहायक जिल्हाधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलावले, रवींद्र भारदे, शुभांगी भारदे, तहसीलदार गणेश जाधव, अपर तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते.

## जायखेडा पोलीसांची धडक कारवाई; गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त

**सटाणा ।** तालुक्यातील अंतापुर येथील मोसम नदी लगतच्या परिसरात जायखेडा पोलीसांनी धडक कारवाई करीत छुप्या पध्दतीने अनाधिकृतरित्या सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या आहेत. या कारवाईत शेकडो लिटर रसायनासह १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात पोलीसांना यश आले असून, चार संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



अंतापूर येथे मोसमनदी परिसरातील दाट झुडपात गावठी दारूच्या हात भट्ट्या लाऊन मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्यात येत असल्याची गुप्त माहिती जायखेडा पोलीसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे जायखेडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काळे यांनी पोलीस कर्मचारी रविद्र कोकणी, अरुण वन्स, पृथ्वीराज बारगळ, शिरोळे, क्षीरसागर आदी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाड टाकली असता गावठी हात भट्टीची दारू तयार करण्यासाठीचा कच्चा रसायनाचा साठा तसेच दारू तयार करण्यासाठी लागणारी साधनसामग्री व गावठी हातभट्टीची दारू मोठ्या प्रमाणात मिळून आली. पोलीसांनी साधन सामग्रीसह दारू बनवण्याचे साहित्य व गावठी हातभट्टीवरील दारूचे तयार रसायन असे एकूण १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. या प्रकरणी अनुसयाबाई सोनवणे, नंदाबाई गवळी, रेखाबाई गवळी, गायत्री गवळी या चौघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## केवडीबन म्हसोबा यात्रा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. गौरव गोवर्धने; उपाध्यक्षपदी अंबादास खैरे

**नाशिक ।** शेकडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या केवडीबन येथील श्री म्हसोबा महाराज देवस्थान यात्रा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. गौरव गोवर्धने यांची नियुक्ती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आली.

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या नाशिक मधील तपोवन परिसरातील श्री क्षेत्र केवडीबन म्हसोबा महाराज मंदिरात मे महिन्यात दरवर्षी यात्रेचे आयोजन केले जाते. या यात्रेत नाशिक सह इतर जिल्ह्यातील तसेच बाहेरील राज्यातील भाविक देखील सहभागी होत असतात. या यात्रा उत्सवात लाखो भाविक येत असतात. पालखी मिरवणूक, ध्वज स्थापना, विविध देवतांचे सोंगे असे विविध कार्यक्रम यावेळी होतात. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन व रूपरेषा आखण्यासाठी व योग्य निर्णय घेण्यासाठी समिती गठित करण्यात येते.

केवडीबन म्हसोबा यात्रा उत्सवाचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी ॲड. गौरव गोवर्धने यांची अध्यक्षपदी पदी नियुक्ती करण्यात आल्याचे सांगितले. यावेळी कार्याध्यक्ष पदी आमदार राहुल ढिकले, उपाध्यक्ष अंबादास खैरे, सहकार्याध्यक्ष डॉ. दिनेश बच्छाव, सचिव समाधान जाधव, सहसचिव हेमंत शेट्टी, खजिनदार धनंजय माने, सहखजिनदार कैलास क्षीरसागर, संघटक प्रमुख मच्छिंद्र सानप, सहसंघटक महेंद्र आव्हाड, दिगंबर मोगरे, मंगेश धनवटे, किरण सोनवणे, दिलीप रावत, तुषार नाटकर, राजेंद्र गरड, प्रसिद्धी प्रमुख राहुल कुलकर्णी, सह प्रसिद्धी प्रमुख शाहू पवार, सल्लागार बाळासाहेब सानप, मामा राजवाडे, रामसिंग बावरी, महंत रविंद्रचार्य महाराज महंत संतोकदासजी उदासी महाराज या कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.




## महापालिकेत महात्मा बसवेश्वर, तुकडोजी महाराजांना अभिवादन

**नाशिक ।** महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन स्वागत कक्ष येथे महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस श्यामराव झारेकर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस सुशीला अंधोळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास शंकरराव पोरजे, साहेबराव भोसले, रमेश पागे, दीपक बंदरे , गणेश भोरे, दुर्गेश भुसारे, मोहन आवटे ,उमाकांत उदार, हर्षल भोरे, संजू सेठ वाळेकर, शेखर भायभंग ,मयुरी मोरे, प्रिया भुसारे, साधना दिवटे, वीणा दिवटे, संगीता चौगुले ,प्रकाश किरगी, संदेश हिंगमिरे, प्रा. प्रेम राज गुळवे, रमेश बडदाळे, नंदकुमार दिवटे, त्रंबक बडदाळे, सुभाष कोपरगावकर ,संतोष घोडके आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## कुंभमेळ्याची कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी : महाजन

**नाशिक ।** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणारा कुंभमेळा सुरक्षित, पर्यावरण पूरक आणि स्वच्छ होण्याचे नियोजन करावे. कुंभमेळ्यानिमित्त करावयाची कामे वेळेत पूर्ण करावीत. त्यासाठी या कामांच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशा सूचना राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात ना. महाजन यांनी कुंभमेळ्यानिमित्त विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार देवयानी फरांदे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. श्रिया देवचक्के आदींसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. महाजन पुढे म्हणाले की, प्रयागराज येथे अलिकडेच कुंभमेळा झाला. या कुंभमेळ्यात भाविक मोठ्या संख्येने गेले होते. या पार्श्वभूमीवर नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणारा कुंभमेळा सुरक्षित, पर्यावरणपूरक होण्यासाठी उपाययोजना आतापासूनच उपाययोजना कराव्यात. तसेच भाविकांसाठी कार्यान्वित करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची कामे वेळेत होतील याची दक्षता घ्यावी. यावेळी मंत्री श्री. महाजन यांनी महानगरपालिका, त्र्यंबकेश्वर नगरपालिका, पोलिस दल, सार्वजनिक बांधकाम विभागासह विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेऊन विविध सूचना केल्या. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम, जिल्हाधिकारी शर्मा यांनी कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

## महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त कुळगाव-बदलापूर नगर परिषदेमध्ये व्हिजीटर ॲपचा शुभारंभ

बदलापूर, दि.२ प्रतिनिधी



१ मे महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून आज कुळगाव-बदलापूर नगर परिषदेमध्ये "व्हिजिटर ॲप" या नव्या डिजिटल सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश नगर परिषदेमध्ये येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतांची माहिती संगणकीकृत पद्धतीने नोंदविणे व सुरक्षिततेसह पारदर्शक प्रशासन सुनिश्चित करणे हा आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ माननीय मुख्याधिकारी तथा प्रशासक मारुती गायकवाड यांच्या हस्ते सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यांनी या प्रसंगी सांगितले की, “व्हिजिटर ॲपच्या वापरामुळे नगर परिषदेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश होऊन, कार्यपद्धती अधिक वेगवान व सुरक्षायुक्त होणार आहे."

या ॲपच्या माध्यमातून नगर परिषदेमध्ये भेट देणाऱ्या अभ्यागतांची नोंद डिजिटल स्वरूपात घेतली जाणार आहे. यामुळे कोणत्या व्यक्तीने, कधी, कोणत्या कारणासाठी नगर परिषदेला भेट दिली याचा ट्रॅक रेकॉर्ड तपासणे अधिक सुलभ होणार आहे.

एखाद्या अभ्यागताच्या येण्याची पूर्वसूचना कर्मचाऱ्यांना एस एम एस द्वारे मिळणार असून त्यामुळे कर्मचारी देखील वेळेत आपल्या कक्षात उपस्थित राहू शकतात. व त्याप्रमाणे आपल्या वेळेचे व कामाचे नियोजन करू शकतात. तसेच, ओळख पटवणे, ID जनरेट करणे ही प्रक्रिया जलद होऊ शकते. ही सुविधा प्रशासकिय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यास मदत करणार असून, नगर परिषदेकडून नागरिकांना अधिक सक्षम सेवा देण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

## पालघर पोलीस दल पुन्हा एकदा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर

# मुख्यमंत्र्यांच्या 7 कलमी कार्यक्रमात अव्वल

पालघर, दि.२ प्रतिनिधी



मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत भारतीय गुणवत्ता परिषदेकडून १०० दिवसांचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये पालघर पोलीस दलास १०० गुणांपैकी ९०.२९ गुण प्राप्त झाले आहेत. त्यामुळे १०० दिवसांच्या कार्यालयीन मुल्यमापनानंतर पोलीस विभागातून महाराष्टातील एकूण ३४ जिल्हा पोलीस दलामधून पालघर जिल्हा पोलीस दलाने पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या अगोदर देखील ५० दिवसांच्या कार्यालयीन मुल्यमापनामध्ये पालघर जिल्हा पोलीस दलाने प्रथम क्रमांक मिळवला होता.

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रम हा संपुर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सदर ७ कलमी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रमामध्ये १. वेबसाईट, २. सुकर जीवनमान, ३. स्वच्छता, ४. तक्रार निवारण, ५. कार्यालयीन सोयी सुविधा, ६. आर्थिक व औद्यागिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, ७. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी इत्यादी विषय आहेत.

पालघर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस प्रशासन लोकाभिमुख व गतीमान करताना वेबसाईट अद्ययावत करून User Friendly बनवली, नागरिकांसाठी Chat Box सुविधा, सुकर जीवनमान अंतर्गत सायबर सुरक्षित पालघर मोहिम, AI based Chat Bot, स्वच्छता मोहिम, तक्रार निवारण दिन, ई-ऑफिस कार्यप्रणाली, Visitor Management System, कार्यालयीन कामकाजामध्ये AI चा वापर, पेट्रोलिंगवर देखरेखीसाठी थर्ड आय ॲप्लीकेशन असे नाविन्यपुर्ण उपक्रम राबवण्यात आले आहेत.

सदरचा ७ कलमी कार्यक्रम पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधिक्षक विनायक नरळे यांच्या संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेवून यशस्वीरित्या राबवला आहे.

# भिवंडी महापालिकेच्या अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

## लोकहिंद पक्षाच्या तक्रार; आझाद गार्डनमधील बांधकाम बंद

भिवंडी, दि.२ प्रतिनिधी

भिवंडी शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मौलाना अबुल कलाम आझाद गार्डनमध्ये पालिकेच्या अधिकाऱ्यांनी मनमानीपणे पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यासाठी मोठा खड्डा खोदला होता. या बांधकामास हरकत घेऊन लोक हिंद पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र विरोध केला. या विरोधानंतर हे काम तात्काळ थांबवण्यात आले असून जमिनीचे सपाटीकरण सुरु केले आहे.याबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून मनमानी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.भिवंडी महानगरपालिकेची उद्याने कमी असून त्यापैकी काही उद्याने नागरिकांच्या दुर्लक्षाने आणि पालिकेच्या उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यांमुळे उजाड झाली आहेत. तर काही उद्यानांची नागरिकांनी नासधूस केली आहे. तर काही उद्यानाच्या जागेवर पालिकेने आपली उपक्रम राबविली आहेत. त्यामुळे शहरातील पर्यावरण ढासळत असून याकडे पालिकेचा पर्यावरण विभाग देखील आपली जबाबदारी टाळत आहे.शहरातील उद्याने कमी झाल्याने मुलांच्या व महिलांच्या करमणुकीला खीळ बसली आहे. अशा स्थितीत भिवंडीतील ५० वर्षापेक्षा जुने असलेले मौलाना अबुल कलाम आझाद गार्डन मध्ये पाणी साठविण्याच्या टाकीचे बांधकाम सुरु केले होते. त्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने मोठा खड्डा बनविला होता. सध्या महिनाभर शाळेला सुट्टी असल्याने मुले खेळण्यासाठी या आझाद गार्डनमध्ये येत आहेत.या खड्ड्यामुळे अपघाताची शक्यता वाढली होती. पालिकेला पाण्याची टाकी बनविण्यासाठी परिसरात खुली जागा आणि पालिकेची आरक्षित जागा असताना पालिकेच्या अधिकाऱ्यांनी या मुलांच्या खेळण्याच्या जागेवर बांधकाम करण्यास घेतले होते. याबाबत लोक हिंद पक्षाचे अध्यक्ष बदीउज्जमान खान यांनी महापालिका आयुक्तांना पत्र लिहून ४८ तासांत खड्डा बुजवला नाही आणि बागेची जमीन सपाट केली नाही तर पक्षाला आंदोलन करण्यास भाग पडेल,असा इशारा दिला होता. महापालिका आयुक्तांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आणि तात्काळ काम थांबवून जमीनीचे सपाटीकरण करण्याचे आदेश दिले. लोकहिन्द पक्षाने "एकदा बाग, नेहमीच बाग" असा नारा देऊन ही बागेतील झाडे व हिरवळ वाचवण्यावर मुलांचे खेळाचे मैदान सुरक्षित ठेवण्यावर भर दिला आहे. हे उद्यान केवळ मुलांसाठी खेळण्यासाठी एक सुरक्षित ठिकाण नाही तर स्थानिक लोकांसाठी ताजी हवा आणि पर्यावरण संतुलनाचा एक महत्त्वाचा स्रोत देखील आहे,असे लोक हिंद पक्षाचे अध्यक्ष बदीउज्जमान खान यांनी सांगितले.यावेळी युवा अध्यक्ष मसूद मोमीन, सचिव अधिवक्ता शाहनवाज अन्सारी, अधिवक्ता शाह आलम, सोहेल मोमीन, बरकत रजाबाकर आणि अशफाक भोपाळी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशासनाने सकारात्मक पावले उचलल्यानंतर, पक्षाने सध्या प्रस्तावित धरणे आंदोलन स्थगित केले आहे, परंतु जर बागेच्या स्थितीत पुन्हा बदल केला गेला तर आंदोलन तीव्र केले जाईल असा इशारा दिला आहे.

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनासह कामगार दिनानिमित्त महापारेषणमध्ये ध्वजवंदन

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य ६६ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण यांनी ध्वजवंदन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. संचालकांनी महाराष्ट्र दिनाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, अधीक्षक अभियंता अमित नाईक, सचिन खडगी, विशाल वाघचौरे, उपमुख्य दक्षता अधिकारी प्रशांत गोरडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, व्यवस्थापक (मानव संसाधन) पारस सवाई, श्रीमती अश्विनी तेरकर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न पाहू या

## आमदार स्नेहा दुबे-पंडित यांचे प्रतिपादन



वसई, दि.२ प्रतिनिधी

105 हुतात्म्यांच्या त्यागावर आपण मुंबईसह महाराष्ट्र मिळवलेला असून, महाराष्ट्राचा त्याग, मराठी भाषा, परंपरा आणि संस्कृती ही आपली शक्तिस्थाने आहेत. त्यांचे जतन आणि संवर्धन व्हावे, ही आपली जबाबदारी आहे. म्हणून महाराष्ट्र धर्म वाढवावा, या ब्रिदाला पाईक होण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी कायम केला पाहिजे. श्रमिक आणि दुर्बल घटकांनासोबत घेऊन, घामाची प्रतिष्ठा वाढेल अशा पद्धतीने सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न आपण पाहूया आणि ते पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध राहू या, असे प्रतिपादन आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी वसईत बोलताना केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख शासकीय ध्वजारोहण समारंभ वसई पश्चिम येथील तहसिलदार कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या समारंभात वसई विधानसभा मतदारसंघाच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर आमदार स्नेहा दुबे यांनी राष्ट्रध्वजाला वंदन केले. यावेळी पोलीस दलाकडून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली परंपरेला उजाळा देत जनतेसाठी समर्पित कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमाला वसईचे प्रांत अधिकारी शेखर घाडगे, तहसिलदार अविनाश कोष्टी, नायब तहसिलदार देवकाते, वसई शहर मंडळ अध्यक्षा गीतांजली दरीवाला, वसई पश्चिम मंडळ अध्यक्ष आशिष जोशी, वसई पूर्व दक्षिण मंडळ अध्यक्ष उदय शेट्टी, श्याम पाटकर, दत्ता नर, अपर्णा पाटील, नंदकुमार महाजन, मुकुंद मुळे, अमित पवार यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, अधिकारी-कर्मचारी, तसेच कामगार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उल्हासनगर महापालिकेसमोर शिवसेनेने होमहवन करुन केले जन आक्रोश आंदोलन; विविध मागण्यांचे दिले निवेदन

उल्हासनगर, दि. २ प्रतिनिधी

उल्हासनगर महापालिकेच्या विरुध्द शहरातील सर्व सामान्य नागरिक सध्या संताप व्यक्त करत आहे . शहरात अनेक समस्या उभ्या ठाकल्या असुन या सर्व समस्या कडे महापालिकेचे लक्ष वेधन्यासाठी व महापालिकेच्या भोंगळ कारभाराविरुध्द शिवसेनेच्या वतीने ( उबाठा ) आज महापालिकेसमोर होम हवन करुन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. या वेळी शिवसेनेचे कार्यकर्ते व सुरक्षा रक्षक यांच्यात झटापट झाली. शंभर दिवसाच्या कृती आराखड्या नुसार महापालिका आयुक्त सौ . मनिषा आव्हाळे यांच्या प्रयत्नानी महापालिका अव्वल स्थानी आली असुन आयुक्ताना प्रथम क्रमांक मिळाला आहे. मात्र आज शिवसेनेने केलेले आंदोलन हे जनतेच्या हिताचे असल्याने या अव्वल स्थानाला जनता मानत नसल्याचे दिसुन येते.

उल्हासनगर शहरात अनेक समस्या असुन या समस्याचे निवारण करण्यात महापालिका आयुक्त अद्याप तरी यशस्वी झाल्या नाहीत. उल्हासनगर शहरातील पाण्याची गंभीर होत चालली असुन पाणीपट्टी मध्ये भरमसाट वाढ केली आहे . यामुळे सर्व सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडणार आहे. तर ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवलेले आहेत त्यामुळे अपघात होऊन जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या पिण्याचे पाणी हे पिवळसर येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.या अशा जटील समस्याचे समाधान व्हावे म्हणुन आज सकाळी ठिक.११ वाजता उल्हासनगर महानगर पालिके समोर जन आक्रोश आंदोलन करण्यात आले .तर प्रशासनाला जाग येण्यासाठी होम हवन सुध्दा केले असुन महापालिकेत निवेदन देण्या साठी जाणाऱ्या शिवसेनेच्या शिष्टमंडळाला प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक व पोलिस यांनी रोखल्याने कार्यकर्त्यांनी प्रवेशद्वार उघडण्याच्या नादात कार्यकर्ते व पोलिस यांच्यात चांगलीच झडप झाली . अखेर पोलिसानी शिष्यमंडळाला स्थायी समितीच्या कार्यालयात जाण्यास परवानगी दिली.

# भिवंडी महानगरपालिकेतर्फे 1 मे रोजी महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन साजरा

भिवंडी, दि.२ प्रतिनिधी



१ मे महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणूनही साजरा केला जातो. १ मे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या हस्ते मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात ध्वजवंदन करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली आणि सर्वाना शुभेच्छा दिल्या.ध्वजवंदनानंतर आयुक्त अनमोल सागर यांनी महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा व स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयच्या प्रवेश द्वाराजवळ हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण केले तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळयास प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से), अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.तसेच शहरातील सर्व राष्ट्र पुरुषांच्या पुतळयांस देखील पुष्पहार अर्पण करण्यात आले.याप्रसंगी मनपाचे अधिकारी आणि कर्मचारी, शिक्षक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अग्निशमन जवान, पोलिस व सुरक्षा कर्मचारी तसेच मनपा अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

## महाराष्ट्रातील महापालिकेमधून उल्हासनगर महापालिका आयुक्त प्रथम

उल्हासनगर, दि.२ प्रतिनिधी

राज्य सरकारच्या १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम अतंर्गत महाराष्ट्रातील एकूण २९ महानगरपालिकेमधून सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून ८६.२९ गुणांसह उल्हासनगर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावला. तर महाराष्ट्रातील सर्व कार्यालयामधून ८६.२९ गुणासह दुसरा क्रमांक पटकांविल्याची माहिती आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिली आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्त पदी मनिषा आव्हाळे यांची नियुक्ती झाल्यावर, त्यांनी आपल्या कामाची चुनक दाखविली. शहरातील बेशिस्त कारभाराला आळा घालून स्मार्ट पार्किंग, स्मार्ट रस्ते, ऑनलाईन बांधकाम परवाने, नागरिकांच्या तक्रारीचे निवरण, कचरा मुक्त शहर, कार्यालयाचे संगणीकीकरण, कामाचे वाटप, भंगार साहित्य व गाड्याची विल्हेवाट, अवैध बांधकामावर अंकुश, पार्किंग झोन, संकेत स्थळावर अध्यावत माहिती शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणेची मोहीम उपक्रम अंतर्गत यशस्वीपणे राबविली. गुरुवारी सकाळी महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते महापालिका प्रांगणात झेंडावंदन झाल्यानंतर महापालिकेने पटकाविलेल्या प्रथम क्रमांकाबाबत माहिती दिली. महापालिका प्रांगणातील झेंडावंदनानंतर आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी उपस्थितांना तंबाखू मुक्त शपथ घेण्यात आली. यावेळी आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते महापालिका समाज मंदिरे व्यवस्थापन प्रणाली ऍपचे उदघाटन केले. महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम अतंर्गत सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे आयुक्त मनिषा आव्हाळे यांचा आमदार कुमार आयलानी यांच्यासह महापालिका अधिकाऱ्यांनी सत्कार करून, आयुक्ताचे तोंड गोड करण्यात आले.

## एस.आर. करंदीकर कॉलेजमध्ये पदवीदान



डहाणू, दि.२ प्रतिनिधी

ज्ञानभारती संस्थेच्या एस.आर. करंदीकर कॉलेज, डहाणू येथे पदवीदान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बी.ए.,बी.कॉम. आणि बी.एम.एस. शाखेतील विद्यार्थ्यांना याप्रसंगी पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्ञानभारती सोसायटीचे चेअरमन बोमन बी. इराणी यांनी भूषवले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना जीवनातील नव्या प्रवासासाठी मार्गदर्शन केले आणि त्यांना यशस्वी भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. कॉलेजचे प्राचार्य डॉ. रुपेश गायकर यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक प्रीतम सुरती यांनी तर आयोजन प्राध्यापक जे.जे. खांडवी यांच्या नेतृत्वात यशस्वीरीत्या पार पडले. त्यांच्यासोबत सर्व प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहकार्य केले. हा सोहळा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून संस्थेच्या गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण परंपरेची साक्ष या सोहळयातून मिळाली.

## रईस हायस्कूलमधील लाचखोर मुख्याध्यापकासह शिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

भिवंडी, दि.२ प्रतिनिधी

भिवंडी तालुक्यातील उर्दू माध्यमाची नामांकित शाळा म्हणून शहरात ओळख असलेल्या रईस हायस्कूल आणि कनिष्ठ विद्यालयाच्या मुख्याध्यापकासह एक शिक्षकाला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ ६० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडून ताब्यात घेऊन अटक केल्याचा खळबळजनक प्रकार गुरुवारी घडला आहे. मुख्याध्यापक जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी (५२) आणि शिक्षक शहाजान मोहम्मदअली मौलाना (५४) अशी अटक केलेल्या लाचखोर लोकसेवकांची नावे आहेत.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुख्याध्यापक जियाउर आणि शिक्षक शहाजान या दोघांनी आपसात संगनमताने डुप्लीकेट सर्व्हिस बुक तयार करुन घेवून व त्यावर वेतन आयोगानुसार नोंदी व शिक्के घेवून देण्याकरीता ५५ वर्षीय पुरुष तक्रारदार यांच्याकडे प्रथम ५० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने १९ मार्च २०२५ रोजी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.दरम्यान २० ते २१ मार्च रोजी दरम्यानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणी कारवाईमध्ये मुख्याध्यापकासह शिक्षकाने ५० हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.तसेच ३० एप्रिल रोजी केलेल्या पडताळणीत लाचखोर शहाजान यांनी तक्रारदारास स्वतःच्या कार्यालयात बोलावून ५० हजार रुपये आणि प्रत्येकी ५ हजार रुपये सर्व्हिस बुकमधील नोंदी घेण्यासाठी खाजगी टायपिस्ट यांच्यासाठी आणि वेतन आयोगानुसार सर्व्हिस बुकवर शिक्के मारण्यासाठी असे एकूण १० हजार रुपये आणण्यास सांगून ६० हजार रुपयांची लाचेची मागणी केली.त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या सापळा कारवाईत सदरची ६० हजार रुपयांची लाचेची रक्कम १ मे रोजी सकाळी तक्रारदाराकडून शिक्षक शहाजान यांना स्वीकारताना रंगेहाथ पकडले असून मुख्याध्यापक जियाउर यांनाही ताब्यात घेण्यात आले असून दोघांवरही गुन्हा दाखल केला असून अटक करण्यात आली आहे.

# सेवा हक्क कायद्यानुसार वीज ग्राहकांना सेवा द्यावी

## सहव्यवस्थापकीय संचालक जगदाळे यांचे निर्देश

कल्याण, दि.२ प्रतिनिधी



राज्यातील जनतेला विविध नागरी सेवा विहित कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने सेवा हक्क कायदा अंमलात आणला आहे. याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिले.

कोकण प्रादेशिक विभागांतर्गत मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंत्यांसमवेत बुधवारी (३० एप्रिल) आयोजित व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये त्यांनी हे आदेश दिले. सेवा हक्क पंधरवडा निमित्ताने राज्य शासनाने महावितरण पोर्टल सुरू केले आहे. यात विविध सेवा वीज ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सेवा विहित कालावधीत ग्राहकांना द्याव्यात. या कामात हयगय करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा त्यांनी दिला. या बैठकीला कल्याण व भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, कोकण परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल डोये, नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, जळगाव परिमंडळाचे मुख्य अभियंता इब्राहिम मुलाणी यांच्यासह सर्व मंडल कार्यालयांचे अधीक्षक अभियंता उपस्थित होते. तत्पूर्वी गोदरेज हिल परिसरातील प्रादेशिक कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक श्री. जगदाळे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवा पंधरवडा निमित्ताने शपथ दिली. यावेळी अधीक्षक अभियंता निलकमल चौधरी, कैलास दुधबर्वे, मोहन काळोगे, उपमहाव्यवस्थापक योगेश खैरनार, सहाय्यक महाव्यवस्थापक हवीषा जगताप उपस्थित होते.



# शेअर बाजारात मोठा चढ-उतार

## सेन्सेक्समध्ये 259 तर निफ्टीत 12 अंकांची वाढ



मुंबई, दि. २ प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी, २ मे रोजी मोठ्या चढ-उतारीनंतर सौम्य वाढ झाली आणि बाजार हिरव्या चिन्हात बंद झाला. सेन्सेक्सने २५९ अंशांची उडी घेतली, तर निफ्टी २४,३५० च्या जवळपास सपाट राहिला. मात्र मध्यम आणि लघु कंपन्यांचे समभाग याच्या उलट व्यवहार करत होते. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.४१ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.०७ टक्क्यांनी घसरले. यामुळे गुंतवणूकदारांना आजच्या व्यवहारात सुमारे ५९,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. सर्वाधिक घसरण ग्राहक टिकाऊ वस्तू, वीज आणि युटिलिटी क्षेत्रातील समभागांत दिसून आली. दुसरीकडे, आयटी आणि तेल व वायू क्षेत्रातील समभागांमध्ये खरेदी झाली.

शेवटी बीएसई सेन्सेक्स २५९.७५ अंकांनी म्हणजेच ०.३२ टक्क्यांनी वाढून ८०,५०१.९९ या पातळीवर बंद झाला. तर एनएसईचा ५० समभागांचा निर्देशांक निफ्टी १२.५० अंकांनी किंवा ०.०५१ टक्क्यांनी वाढून २४,३४६.७० या पातळीवर बंद झाला.

बीएसईमध्ये सूचीबद्ध असलेल्या कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज २ मे रोजी घटून ४२२.६५ लाख कोटी रुपये झाले, जे मागील व्यवहार दिन म्हणजेच ३० एप्रिल रोजी ४२३.२४ लाख कोटी रुपये होते. यामुळे बीएसईतील कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे ५९,००० कोटी रुपयांनी घटले. म्हणजेच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ५९,००० कोटी रुपयांची घसरण झाली आहे.

बीएसई सेन्सेक्समधील ३० पैकी १९ समभाग आज हिरव्या चिन्हात म्हणजेच वाढीसह बंद झाले. यात अदाणी पोर्ट्सच्या समभागात सर्वाधिक म्हणजे

**सेन्सेक्स 80,501**

**निफ्टी 24,346**

४.११ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर बजाज फायनान्स, इंडसइंड बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि मारुती सुझुकी चे समभाग १.२१ टक्क्यांपासून २.६२ टक्क्यांपर्यंत वाढले.

तर उर्वरित ११ समभाग आज घसरणीसह बंद झाले. यामध्ये नेस्ले इंडियाचा समभाग २.२८ टक्क्यांनी घसरून सर्वाधिक नुकसान करणारा ठरला. तसेच एनटीपीसी, कोटक महिंद्रा बँक, टायटन आणि पॉवर ग्रिड या कंपन्यांचे समभाग ०.८५ टक्क्यांपासून १.६१ टक्क्यांपर्यंत घसरले.

बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर आज वाढीने बंद होणाऱ्या समभागांची संख्या अधिक होती. एकूण ४,०८५ समभागांमध्ये आज व्यवहार झाला. यापैकी १,७६१ समभाग वाढीसह बंद झाले. तर २,१८३ समभागांमध्ये घसरण झाली आणि १४१ समभाग कोणतीही हालचाल न होता सपाट बंद झाले. याशिवाय, ६७ समभागांनी आजच्या व्यवहारात आपली नवीन ५२ आठवड्यांची उच्चांकी पातळी गाठली, तर ५८ समभागांनी आपली नवीन ५२ आठवड्यांची नीचांकी पातळी गाठली.

# मदरसे रिकामे, हॉटेल्स-गेस्ट हाऊसमध्ये सैन्य

## भारताच्या भीतीने पीओकेमध्ये आणीबाणीसारखी परिस्थिती



नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

भारताकडून संभाव्य हल्ल्याच्या भीतीनेच धीर खचलेल्या पाकिस्तानमध्ये आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये पर्यटकांना प्रवेश बंदी केली आहे. मदरसे रिकामे केले आहेत. तर हॉटेल्स आणि गेस्ट हाऊसमध्ये सैन्याला ठेवलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी लष्कराच्या तिन्ही दलांना लक्ष्य, वेळ आणि दिवस ठरवा... यासाठीचे संपूर्ण स्वातंत्र्य संरक्षण दलांना आहे. दहशतवादाला वरदहस्त देणाऱ्यांना त्यांनी विचारही केला नसेल, असा धडा शिकवा, असे आदेश आहेत. त्यामुळे भारत कधीही लष्करी कारवाई करेल, या भीतीने पाकव्याप्त काश्मीरमध्ये थरकाप उडाला आहे. पीओकेचे पंतप्रधान चौधरी अन्वरुल हक यांनी गुरुवारी परिस्थिती आणखी बिकट झाली तर या प्रदेशात आणीबाणी लागू केली जाऊ शकते, असे संकेत दिले आहेत.

भारताच्या कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने पीओकेमधील १ हजारहून अधिक मदरसे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भारत मदरशांना दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे म्हणून लक्ष्य करेल या भीतीने १० दिवसांसाठी मदरसे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षेसाठी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. भारताने हल्ला केल्यास अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे, असा दावा पीओके सरकारने केला आहे. आपत्कालीन निधीत एक अब्ज रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत. हॉटेल्स, गेस्टहाऊस आणि लग्न समारंभाचे हॉल सैन्याला राहण्यासाठी दिले आहेत. शाळांमध्ये मुलांना हल्ल्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे. २६ पर्यटकांना दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या घातल्या. भारताने या हल्ल्यासाठी पाकिस्तानला जबाबदार धरले आहे. गुरुवारी पाक अधिकाऱ्यांनी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील इतर संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घातली. अनेक पर्यटकांना मार्बल चेकपोस्टवरून परत पाठवण्यात आले. लिपा व्हॅलीमधील रहिवाशांना नियंत्रण रेषेजवळ जाण्यास मनाई करण्यात आली. तसेच सुरक्षा एजन्सींना सहकार्य करण्यास सांगितले आहे.

### विमान सेवांवरही निर्बंध

या महिन्यात कराची आणि लाहोर हवाई हद्दीतील विमान वाहतूक दररोज सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत बंद ठेवण्यात आली आहे. गिलगिट-बाल्टिस्तानमधील हवाई क्षेत्र आधीच बंद केलं आहे. इस्लामाबाद ते गिलगिट-स्कर्दूला जाणारी विमाने सलग दुसऱ्या दिवशी रद्द करण्यात आली. खराब हवामानामुळे इस्लामाबादमधील पाच आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानांचे उड्डाण उशिराने झाले तर काही इतर शहरांमध्ये वळवण्यात आली. 'भारतीय सैन्याकडून गोळीबार होत आहे, ज्यामुळे नुकसान झाले आहे. प्रत्येक परिस्थितीला तोंड देण्यास तयार आहोत,' असे चौधरी अन्वरुल हक यांनी विधानसभेत सांगितले.

# इस्लाम दहशतवादी हल्ले शिकवत नाही

## इंडोनेशियाने दाखवला पाकिस्तानला आरसा

जकार्ता, दि.२ वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर जगभरातून शोक संवेदना व्यक्त करण्यात येत आहे. तसेच दहशतवादाविरूद्धच्या भारताच्या लढाईत सोबत असल्याची भूमिका अनेक देशांनी व्यक्त केली आहे. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी पाकिस्तानला आरसा दाखवत शस्त्र सोडून चर्चेतून मार्ग काढण्याचा सल्ला दिला आहे.

इंडोनेशियातील भारतीय राजदूतांना भेटल्यानंतर सुबियांतो यांनी काश्मीर दहशतवादी हल्ल्याबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. या दरम्यान, प्रबोवो यांनी पाकिस्तानचे नाव न घेता त्याला एक मोलाचा सल्ला दिला. इंडोनेशियन राष्ट्राध्यक्ष म्हणाले की, इस्लाम आपल्या देशात हे शिकवत नाही.



जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १९ भारतीयांचा जीव गेला होता. या घटनेची मस्लिम देश इंडोनेशियाने निंदा केली आहे. तसेच राष्ट्राध्यक्ष सुब्रितांयो यांनी पाकिस्तानला आरसा दाखवला आहे. सुबियांतो यांनी इंडोनेशियातील भारताच्या राजदुतांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी काश्मीर पहलगाम घटनेवर शोक व्यक्त केला. यावेळी सुब्रीयांतो यांनी पाकिस्तानचे नाव न घेता एक सल्ला दिला. इंडोनेशियाचे राष्ट्रपती म्हणाले, इस्लाम आपल्याला असे शिकवत नाही.

लोकशाहीमध्ये नियंत्रित लष्करी प्रभावाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पहलगाममधील या दहशतवादी हल्ल्याचा प्रबोवो यांनी तीव्र निषेध केला. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाविरुद्ध सहकार्य वाढविण्यावरही सहमती दर्शविली.

इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो म्हणाले की, इस्लाम अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले करण्याचे शिकवत नाही. काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याबद्दल आपले मत व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, इंडोनेशियामध्ये प्रचलित असलेल्या इस्लामच्या शिकवणीत अशा दहशतवादी हल्ल्यांना स्थान नाही. त्यांनी इंडोनेशियातील भारतीय राजदूत संदीप चक्रवर्ती यांना हे सांगितले. अशा दहशतवादाचे कोणतेही परिणाम निघू शकत नाहीत, असे ते म्हणाले. म्हणून, शस्त्रांशिवाय संवादाचा मार्ग निवडला पाहिजे.

# पूजा खेडकर पुणे पोलिसांत हजर

## मनाने आलेली नाही, सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप

पुणे, दि. २ प्रतिनिधी

आरोपी जो काही गुन्हा केला आहे ते कोर्टाने निर्णय दिला तोवर कबुल करत नाही. पूजा खेडकर ही काही स्वत:च्या मनाने पोलीस चौकशीला आली असा भाग नाही. युपीएससी सारख्या संस्थेने या मॅडमना सेवेतून बडतर्फ केले, त्यांच्यावर गुन्हा दाखल केला ही गोष्टच पुरेशी आहे. जर खेडकर यांच्यावर केलेले आरोप खोटे निघाले किंवा त्यांनी दिलेली सर्टिफिकेट खरे असल्याचे मानले गेले तर देशात हाहाकार उडेल. लोक बिनदिक्कत खोटे डॉक्युमेंट देऊन काहीही करतील, अशी भीती सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी व्यक्त केली आहे. पूजा खेडकर आज पुणे पोलिसांसमोर हजर झाली आहे.

कुंभार यांनी न्यायालयाकडून तिला मिळत असलेल्या संरक्षणावर तसेच विलंबावर नाराजी व्यक्त केली. वडिलांचे खोटे उत्पन्न देणे, जातीचे दाखले देणे, खोटे वैद्यकीय सर्टिफिकेट देणे या सगळ्या गोष्टी तिच्या विरोधात आहेत. तिने कबूल करणे हे शक्य नाहीय. सर्वोच्च न्यायालयातून वारंवार तिच्या अटकेला संरक्षण दिले जात आहे. आतासुद्धा तिला २१ मे पर्यंत संरक्षण आहे. पोलिसांनी कस्टडीत घेऊन चौकशीची मागणी केली आहे, ती योग्य आहे. कारण पूजा खेडकर ही एकटी नाहीय. तिला खोटे दाखले देणारे, मदत करणारे तिला लवकर युपीएससी जागा मिळावी म्हणून ज्यांनी मदत केली, गाड्या वापरल्या, येथील जिल्हाधिकाऱ्यांवर आरोप केलेत त्याची चौकशी होणे गरजेचे आहे, असे कुंभार यांनी सांगितले.

युपीएससीला वडिलांच्या नावात स्पेलिंग बदलून फसविले आहे, तिने नावे कशी बदलली हे समोर आले पाहिजे. तो गुन्हा आहे. वैद्यकीय दाखले तीन ठिकाणी घेतले, वेगळी कारणे पुरावे दाखविण्यात आले. जिथून ही सर्टिफिकेट मिळाली तिथूनही पासपोर्ट ओपन होता, तो कोणीतरी वापरला असेल असे सांगितले जात आहे, असेही कुंभार यांनी सांगितले.

आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी २०२२ च्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अर्ज करताना चुकीची माहिती दिल्याचा आरोप खेडकरवर आहे. मात्र, खेडकरने तिच्यावर झालेल्या सर्व आरोपांचे खंडन केले आहे. जुलै २०२४ मध्ये हे प्रकरण उघडकीस आले होते. युपीएससीने गुन्हा दाखल करूनही पूजा खेडकर न्यायालयात अटकेपासून संरक्षण मिळवत आली आहे, यामुळे तिची चौकशी केल्याशिवाय तपास पुढे जाऊ शकलेला नाही. पूजा खेडकरनं देशातील सर्वात प्रतिष्ठेची आयएएस परीक्षा पास केली होती. ऑल इंडिया रँकिंगमध्ये ती ८४१ क्रमांकाने उत्तीर्ण झाली. त्यानंतर ट्रेनिंग घेत असिस्टेंट कलेक्टर या पदावर ज्वाईन झाली होती. परंतु गाडीवर लाल दिवा लावण्याची इच्छा आणि अतिरिक्त कलेक्टरच्या चेंबरवर कब्जा करण्याचा प्रयत्न यामुळे तिचा सर्वच खेळ उघड झाला होता. पूजा खेडकर त्यावेळी चर्चेत आली जेव्हा तिने तिच्या खासगी ऑडी कारवर लाल दिवा लावला आणि पुण्याचे अतिरिक्त कलेक्टर सुहास दिवासे यांच्या चेंबरवर कब्जा केला. दिवासे यांनी याबाबत तक्रार केली. त्यानंतर त्यांची बदली वाशिमला झाली.

# भूतकाळात दहशतवादी गटांना मदत पुरविली

## बिलावल भुट्टोनेही मान्य केले पाकिस्तानचे पाप

इस्लामाबाद, दि. २ वृत्तसंस्था

पाकिस्तानकडून दहशतवाद पुरस्कृत केला जाते, असा आरोप भारतासह अनेक देशांनी आजवर केलेला आहे. पाकिस्तानने मात्र कधीही ही बाब स्वीकारली नव्हती. मात्र २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी स्काय न्यूजला दिलेल्या मुलाखतीमध्ये पाकिस्तानने अमेरिका आणि पाश्चात्या देशांच्या सांगण्यावरून दहशतवादाला खतपाणी घातल्याचे मान्य केले होते. आता पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो-झरदारी यांनीही ही बाब मान्य केली असून इतिहासात आम्ही हे घाणेरडे कृत्य केल्याचे कबूल केले आहे.

बिलावल भुट्टो यांनीही स्काय न्यूजला नुकतीच मुलाखत दिली. यावेळी त्यांच्यासमोरही ख्वाजा आसिफ यांना विचारलेला प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना भुट्टो म्हणाले की, हे काही आता गुपित राहिलेले नाही. पाकिस्तानने भूतकाळात दहशतवादी गटांना मदत पुरविली होती.

भुट्टो पुढे म्हणाले, "पहिल्या अफगाण युद्धादरम्यान पाकिस्तानने मुजाहिदीनला पाठिंबा देऊन त्यांना निधी पुरवठा केला होता. पाकिस्तानचा यात सक्रिय सहभाग होता. पाश्चात्य देशांसह एकत्र येऊन आणि त्यांच्या साथीने आम्ही हे काम केले. पाकिस्तानात दहशतवादाच्या अनेक लाटा येत राहिल्या. यात आमचेही नुकसान झाले."

पाकिस्तानने भूतकाळात दहशतवादाला पोसले असले तरी आता मात्र परिस्थिती बदलली आहे, असा दावाही भुट्टो यांनी केला. "आज आम्ही दहशतवादाच्या कोणत्याही कृत्यात सामील नाहीत. इतिहासात नक्कीच दुर्दैवाने आम्ही याचा भाग होतो. पण यातून आम्ही काही धडेही शिकलो", असे भुट्टो यांनी या मुलाखतीत सांगितले.

# कृत्रिम प्रज्ञेसाठी मराठीचा ज्ञानकोश

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता भविष्याच्या दृष्टीने भाषेबाबत आवश्यक आहे. हीच गरज ओळखून मुंबईतील माटुंग्याच्या वीरमाता जिजाबाई इन्स्टिट्यूटमधील इन्क्युबेशन सेंटर मध्ये दोन विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमतेसाठी मराठीतील सर्वात मोठे लार्ज लँग्वेज मॉडेल तयार केले आहे. हे मॉडेल नेमके काय आहे?या संधर्भात ओम पाटील यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

साप्ताहिक संवाद

**१] कृत्रिम प्रज्ञेसाठी मराठीचा ज्ञानकोश म्हणून तयार केलेले हे लार्ज लँग्वेज मॉडेल काय आहे?**

या लार्ज लँग्वेज मॉडेल विकसित करताना आम्ही मराठी भाषेत प्रकशित झालेल्या १०० जीबी पर्यंतच्या आकाराच्या डेटाचा वापर केला आहे. यात अनेक साहित्यिकांच्या साहित्यापासून विश्वकोश, राज्य लोकसेवा परीक्षेचे साहित्य, विविध मराठी संकेतस्थळ आदी मराठीतील साहित्य आणि ज्ञान लेखनाचा समावेश आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेत म्हणजेच एआय तंत्रज्ञानात मराठी भाषेचा समावेष करण्यासाठी त्या भाषेतील माहिती असणे आवश्यक असते. चाट जीपीटी या ओपन ए आय सोअर्सकडे जगभरातील माहितीचा तपशील असला तरी, या प्रणालीला एखादा प्रश्न मराठीत विचारला तर हि प्रणाली विविध भाषांमधील उपलब्ध माहिती वापरून त्याचे उत्तर देते. त्यामुळेच आम्ही सेरेब्रलझिम टेक्नॉलॉजीस हि स्टार्ट अप कंपनी सुरु करून हे लार्जर लँग्वेज मॉडेल तयार केले आहे.

लोकरंग

**२]मराठी भाषेत हे मॉडेल तयार करताना कोणती आव्हाने समोर होती?**

सर्वात महत्वाचं म्हणजे एआय तंत्रज्ञानात मराठी भाषेत साहित्य उपलब्ध नव्हतं. मराठी भाषेची हि त्रुटी दूर करण्यासाठी आम्ही हे मॉडेल तयार केले. हे मॉडेल तयार करण्यासाठी इन्क्युबेशन सेंटर ने प्रचंड मोठ्या क्षमतेचा सर्वर उपलब्ध करून दिला आहे. फक्त मराठी लार्ज लँग्वेज वर आधारित असलेल्या प्रणालीत देखील फक्त १३ जीबी डेटावर काम केले आहे. मराठी भाषेत योग्य परिणाम साध्य होण्यासाठी मग आम्ही मराठीतील दर्जेदार साहित्याकडे मोर्चा वळवला. यात वि . स. खांडेकर, पु.ल.देशपांडे, कुसुमाग्रज, दया पवार, अण्णाभाऊ साठे अशा मराठी साहित्यिकांचे साहित्य या प्रणालीवर घेतले आहे.

**३]या मॉडेलचा वापर कसा होणार आहे?**

हा डेटा फक्त लोड करून चालत नाही तर व्याकरणातील विशेष कसोट्या वापरून त्याला प्रशिक्षित करावे लागते. सध्या या मॉडेलचा वापर काही सरकारी विभागात वापरण्याच्या दृष्टीने चाचणी सुरु आहे. अभिजात मराठी भाषेची सांगड अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी घालण्य्साठी हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

# धार्मिक पर्यटन स्थळांचा वारसा जपणारे कोल्हापूर

पर्यटनासाठी महाराष्ट्रातील कोल्हापूर सारख धार्मिक आणि तितकाच निसर्गरम्य ठिकाण पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय स्थळ आहे.कोल्हापुरात विराजमान, महालक्ष्मी अंबाबाई मंदिर हे महाराष्ट्रातील सर्वात प्रसिद्ध आणि पूजनीय देवस्थानांपैकी एक आहे. शिवाय ज्योतिबाला केदारेश्वर-केदारलिंग असेही म्हणतात. डोंगरमाथ्यावर पोहोचल्यावर कोल्हापूर शहराचे विहंगाम दृश्य पाहायला मिळते.मंदिराची वास्तुकला देखील भव्य आहे.कोल्हापूरच्या वायव्येला, शांततेच्या कुशीत विसावलेला, ज्योतिबा डोंगर आपल्या भव्यतेने सर्वांना मोहित करतो. हजार फूट उंचीवर उंचावलेला हा डोंगर, सपाट प्रदेशातून उंच उंच उंचावल्याने एका भव्य शंखाकृतीला साकारून उभा आहे. 'वाडी रत्नागिरी'



चला पर्यटनाला

नावाने ओळखला जाणारा हा डोंगर, सह्याद्रीच्या रांगेचाच एक भाग आहे आणि पन्हाळा आणि कृष्णा नदी यांच्यामध्ये दुर्मिळ सौंदर्याने नटलेला आहे.डोंगराच्या पठारावर, ज्योतिबा मंदिर आणि गाव वसलेले आहे. देवळाकडे जाताना, प्रथम आपल्या स्वागतासाठी येते भव्य दगडी प्रवेशद्वार, मराठा शैलीतील कलाकुसरीने सजलेले. या प्रवेशद्वारातून प्रवेश करताच, पायऱ्या उतरता उतरता दिसू लागतात तीन देवळांचा भव्य समूह. या तिघांमध्ये मध्यभागी, केदारलिंगाचे मुख्य देवालय आपल्या भव्यतेने सर्वांना आकर्षित करते.ज्योतिबा भक्त किवळ गावचे नावजी साळुंखे पाटलांनी (संत नावजीनाथ) बांधलेले असल्याचे सांगितले जाते. १७३० मध्ये राणोजीराव शिंदे यांनी या मूळ देवळाच्या जागी नवीन भव्य देवालय बांधले. ५७ फूट लांब, ३७ फूट रुंद आणि ७७ फूट उंच शिखरासह हे देवालय आजही ज्योतिबाची भक्ती आणि कलाकुसरीचे प्रतीक आहे.

# मुंबईत तिसरे प्रगत कर्करोग उपचार केंद्र सुरु

सनएकट–अडवांस कॅन्सर थेरेपी, ही देशात सर्वात प्रगत आणि नाविन्यपूर्ण कर्करोग उपचार परवडणाऱ्या किमतीत सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने डॉ. विजय पाटील आणि डॉ. अशय कारपे यांनी स्थापन केलेली ऑन्कोलॉजी स्टार्ट-अप कंपनीने भारतातील आपले तिसरे आणि मुंबईतील पहिले सेंटर खार येथील डॉ.गुप्ते सर्जिकल हॉस्पिटलमध्ये सुरू केले आहे. या नव्या सेंटरमध्ये भारतात प्रथमच घनगंभीर ट्युमरसाठी CAR-T उपचार तसेच सनएकट द्वारे भारतात प्रथमच सादर होणारे विविध उपचार उपलब्ध असणार आहेत.हे सेंटर अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर डॉ. सुधीर गुप्ते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुधीर गुप्ते उपस्थित होते. यांच्यासोबत, डॉ. (प्रोफ.) विजय पाटील – संस्थापक आणि प्राध्यापक, सनएकट–अडवांस कॅन्सर थेरेपी डॉ. अशय कारपे – सहसंस्थापक, सनएकट; श्री. कुशाग्र शर्मा – मुख्य कार्यकारी अधिकारी,सनएकट आणि सन्माननीय पाहुणे डॉ. कुमार प्रभाष – प्राध्यापक आणि प्रमुख, मेडिकल ऑन्कोलॉजी विभाग (घनगंभीर ट्युमर), टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई उपस्थित होते.




दखल

सनएकटचे संस्थापक आणि कर्करोग तज्ज्ञ डॉ. विजय पाटील म्हणाले, "या उद्घाटनामागे केवळ वाढ नव्हे, तर कर्करोग उपचारात समानता आणि प्रवेशयोग्यता निर्माण करण्याची चळवळ आहे. सनएकट मध्ये आमचा उद्देश असा आहे की भौगोलिक स्थानावरून उपचाराच्या दर्जाचे ठरवले जाणे थांबावे. खारमधील हे केंद्र म्हणजे आमच्या स्वप्नाला प्रत्यक्षात आणण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे – अत्याधुनिक उपचार स्थानिक परिसरात उपलब्ध करून देणे."

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# अधिकाधिक हिंदू तरुणींवर बलात्कार करण्याचे होते लक्ष्य

## भोपाळ लव्ह जिहाद प्रकरणातील आरोपीचा धक्कादायक दावा

भोपाळ, दि. २ वृत्तसंस्था

मध्य प्रदेशमधील भोपाळ येथे एका कथित लव्ह जिहाद प्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणातील आरोपींना भोपाळमधील कुणीतरी कुख्यात गुंड आर्थिक मदत करत असल्याचेही उघड झाले आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी फरहान, अली आणि साद हे तिघेही सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमी असतानाही आलिशान जीवन जगत होते. त्यातील फरहानकडे तब्बल ३ लाख रुपये किंमत असलेली स्पोर्ट्स बाईक होती. तर अली याला महागड्या घड्याळांचा शौक होता. तसेत आरोपी पीडित तरुणींना महागड्या हॉटेलमध्ये घेऊन जायचे, असेही तपासामधून उघड झाले आहे.

एवढंच नाही तर यातील एक आरोपी फरहान याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीमधून आणखीनच धक्कादायक माहिती समोर आली आहे. ''मी कुठलंही चुकीचं काम केलेलं नाही, उलट मी जे काही केलं ते पुण्याचं काम होतं. अधिकाधिक हिंदू मुलींवर बलात्कार करणं हेच माझं लक्ष्य होतं'', असा दावा या आरोपीने केल्याचे सूत्रांनी म्हटले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही संपूर्ण टोळी लव्ह जिहादच्या उद्देशाने हिंदू तरुणींना लक्ष्य करून त्यांच्यावर बलात्कार करत असे. या प्रकरणी शनिवारी राष्ट्रीय महिला आयोगाची टीम भोपाळ येथे पोहोचणार आहे. तसेच बलात्कार आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणी चौकशी करणार आहे.

दरम्यान, एका पीडित तरुणीने पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. हे सर्व आरोपी आधी हिंदू तरुणीशी मैत्री करायचे. मग बाहेर भेटायला बोलवायचे. त्यानंतर प्रेम आणि लग्नाचं आमिष दाखवून त्यांच्यावर बलात्कार करायचे आणि त्याचं चित्रिकरण करायचे. असा व्हिडीओ तयार केल्यानंतर आता तुझ्या मैत्रिणींसोबतही आमची मैत्री करून दे म्हणून पीडित मुलींवर दबाव आणायचे. त्याशिवाय आरोपी तरुणी पीडित मुलींवर आपल्या इतर मित्रांसोबत शरीरसंबंध प्रस्थापित करण्यासाठीही दबाव आणायचे.

# भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यास ईशान्येकडील राज्य ताब्यात घ्या

## बांगलादेशने गरळ ओकली

ढाका, दि. २ वृत्तसंस्था

पाकिस्तानचे सैन्य बांगलादेशमधील जनतेवर अत्याचार करत असताना भारताने आपल्या सैन्याच्या मदतीने बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून दिले होते. मात्र आता बांगलादेश चीनच्या जोरावर भारताविरोधातच गरळ ओकू लागला आहे. बांगलादेशच्या लष्करातून निवृत्त झालेले अधिकारी आणि सध्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांचे निकटवर्तीय असलेल्या एएलएम फझलूर रहमान यांनी भारताविरोधात विधान केले आहे. 'भारताने जर पाकिस्तानवर हल्ला केला तर बांगलादेशने ईशान्य भारतातील राज्ये ताब्यात घ्यावीत', असे विधान त्यांनी केले.

निवृत्त लष्करी अधिकारी एएलएम फजलूर रहमान यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून सदर विधान केले आहे. तसेच बांगलादेशने आतापासूनच चीनशी संयुक्त लष्करी कारवाईबाबत संवाद सुरू करावा, असाही सल्ला त्यांनी दिला आहे.

"भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यास बांगलादेशने ईशान्य भारतातील सर्व सात राज्य ताब्यात घ्यावीत. या विषयासंदर्भात चीनबरोबर संयुक्त लष्करी कारवाई करण्यासाठी आतापासूनच चर्चा सुरू करावी, असे मला वाटते", अशा आशयाची एक पोस्ट रहमान यांनी फेसबुकवर लिहिली आहे. एएलएम फजलूर रहमान हे २००९ साली घडलेल्या बांगलादेश रायफल्स (बीडीआर) हत्याकांडाची चौकशी करणाऱ्या राष्ट्रीय स्वतंत्र चौकशी आयोगाचेही अध्यक्ष आहेत.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमधील तणाव वाढल्यानंतर बांगलादेशचे हे विधान समोर आले आहे. मात्र बांगलादेशच्या अंतरिम सरकारने फजलूर रहमान यांच्या विधानापासून अंतर राखले आहे. मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या कार्यालयातील प्रेस सचिव शफीकुल आलम यांनी म्हटले की, फजलूर रहमान यांनी केलेले विधान त्यांचे वैयक्तिक मत आहे.

शफीकुल आलम पुढे म्हणाले, "अंतरिम सरकार कोणत्याही प्रकारची भूमिका जाहीर व्यक्त करत नाही आणि रहमान यांनी केलेल्या विधानाशी आम्ही सहमत नाही. बांगलादेश सर्व राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आणि स्वातंत्र्याचा आदर करतो. तसेच इतरांकडूनही याचप्रकारची अपेक्षा ठेवतो. मेजर जनरल फजलूर रहमान यांनी केलेली टिप्पणी वैयक्तिक असून त्यात बांगलादेश सरकारला ओढू नका, असे आवाहन आम्ही करत आहोत."

# मुंबई इंडियन्स ठोकणार आयपीएल विजेतेपदाचा षटकार!

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

पाच वेळच्या चॅम्पियन मुंबई इंडियन्सने इंडियन प्रीमियर लीग २०२५ मध्ये सलग सहावा विजय नोंदवून पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. आयपीएल २०२५ च्या ५० व्या सामन्यात एमआयने राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी दारुण पराभव केला. आयपीएलच्या इतिहासात असे तीन वेळा घडले आहे जेव्हा एमआयने एका हंगामात सलग सहा विजयांची नोंद केली आहे. या संघाने पहिल्यांदा २००८ च्या हंगामात अशी कामगिरी केली होती. त्यानंतर त्यांनी २०१७ च्या हंगामातही सलग विजयाचा षटकार खेचला होता. आता १८ व्या हंगामात खराब सुरुवातीनंतर मुंबई संघ विजयी रथावर स्वार होऊन विजेतेपदाकडे झेपावला आहे. विशेष म्हणजे जेव्हा



जेव्हा एमआयने सलग पाच किंवा त्याहून अधिक विजय मिळवले आहेत तेव्हा ते अंतिम फेरीत पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत (२००८ चा हंगाम वगळता). २००८ व्यतिरिक्त, मुंबई इंडियन्सने २०१७ मध्ये विजेतेपद जिंकले. आता या हंगामात संघाने सलग सहा सामने जिंकून धमाकेदार कमबॅक केले आहे. जर या आधीच्या योगायोगावर विश्वास ठेवला तर मुंबई इंडियन्स अंतिम फेरीत पोहोचण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.विजेतेपदाच्या सामन्यांमध्ये एमआयचे रेकॉर्ड चांगले राहिले आहे. विशेषतः रोहित शर्मा संघात सामील झाल्यानंतर, संघाने प्रत्येक अंतिम सामना जिंकला आहे. यावेळी हार्दिक पंड्या कर्णधार आहे. पंड्याने याआधी त्याच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्सला चॅम्पियन बनवले आहे. सूर्यकुमार यादव देखील संघात चांगली कामगिरी करत आहे.

### एमआयची विजयाची टक्केवारी १००

जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर झालेल्या आयपीएल २०२५ च्या ५० व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना एमआयने निर्धारित २० षटकांत २ गडी गमावून २१७ धावा केल्या. या संघाने २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य यशस्वीरित्या राखण्याची आणि इतके लक्ष्य ठेवल्यानंतर एकही सामना गमावण्याची ही १७ वी वेळ आहे. याचा अर्थ असा की प्रथम फलंदाजी करताना २०० पेक्षा जास्त धावा केल्यानंतर विजयाच्या बाबतीत एमआयचा १०० टक्के रेकॉर्ड आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com